अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २ ऑक्टोंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ४ था | किंमत : ५ रुपये | पाने ८




## पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

### महाविद्यालय विभाग

- अे. आर. बुर्ला वरिष्ठ महिला महाविद्यालय
- कुचन कनिष्ठ महाविद्यालय
- कुचन कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण
- सौ. भू. म. पुल्ली कन्या कनिष्ठ महाविद्यालय
- रामकृष्णपंत बेत रात्र कनिष्ठ महाविद्यालय
- देविदास न. बत्तीन तांत्रिक प्रशिक्षण विभाग

### माध्यमिक विभाग

- कुचन प्रशाला
- कुचन प्रशाला - तेलुगु माध्यम
- सौ. भू. म. पुल्ली कन्या प्रशाला
- मातोश्री जनाबाई ज. बिटला प्रशाला
- रामकृष्णपंत बेत रात्र प्रशाला
- डि. आर. श्रीराम इंग्लिश मि. स्कूल

### प्राथमिक विभाग

- नारायणराव कुचन प्राथमिक शाळा
- राजमल ना. बोमड्याल प्राथमिक शाळा
- रामदास न. इप्पाकायल प्राथमिक शाळा
- रामव्वाबाई रा. बुर्ला प्राथमिक शाळा
- डि. आर. श्रीराम इंग्लिश मिडीयम प्रायमरी स्कूल

### बालक मंदिर व विभाग

- भूदेवीबाई कटकम बालक मंदिर
- भारतीबाई रा. बोमड्याल बालक मंदिर
- भूदेवीबाई रा.इप्पाकायल बालक मंदिर
- रामव्वाबाई रा. बुर्ला बालक मंदिर
- डि. आर. श्रीराम इंग्लिश मिडीयम स्कूल

सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद..

# ढोंगी मोहिमा...

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती. देशभर स्वच्छता अभियान आणि प्रार्थना होणार आहे. महात्माजींची ईश्वरावर अपार श्रद्धा.रोज त्यांची ईश्वराकडे प्रार्थना असायची. जनसेवा हीच ईशसेवा हे त्यांचे ब्रीद. जिथे स्वच्छता, तिथे लक्ष्मी वसे, हा हिंदू संस्कृतीचा आदर्शही गांधीजींनी सांगितला. त्यामुळे या जयंतीचे औचित्य साधून स्वच्छतेची मोहीम राबवली जाते. माणसाच्या जीवनात स्वच्छता ही आवश्यक बाब बनली आहे. उत्तम आरोग्य हीच लाखाची संपत्ती, असे धर्मशास्त्र सांगते. अस्वच्छता कोणाची? माणसाचीच. माणूस सर्वत्र घाण करत असतो. तेव्हा आपण केलेली घाण आपण स्वच्छ करायची. त्यात बिघडले कुठे? सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता तर राष्ट्रीय कार्य समजूनच केले पाहिजे. यासाठी कोकणातील रेवदंडा येथील धर्माधिकारी प्रतिष्ठानचा आदर्श सांगता येईल. केंद्र सरकारने स्वच्छता ही सेवा मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला. याच पार्श्वभूमीवर राज्यासह देशभरात 'स्वच्छता हीच सेवा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गिरगाव चौपाटीवर स्वच्छता केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवडी तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती येथील स्वच्छता सेवा अभियानात सहभाग घेतला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी अहमदाबादेत सहभाग घेतला. दरम्यान, स्वच्छता हीच सेवा मोहिमेंतर्गत राज्यात 'एक तारीख एक तास' मोहिमेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला असून ७२ हजारांपेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छतेची मोहीम राबवण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे आज स्वच्छतेची ही लोक चळवळ झाली आहे, असे यावेळी गिरगाव येथे शिंदे बोलताना म्हणाले. खरे आहे. मोदींनीच स्वच्छतेच्या विषयाला हात




घातला. देशाची लोकसंख्या वाढत चालली आहे. त्यानुसार सार्वजनिक अस्वच्छही वाढत चालली आहे. उघड्यावरती नैसर्गिक विधी, रस्त्यावरच कचरा टाकणे, घरातील सांडपाणी रस्त्यावरच सोडले जाते. गावागावांमधील आणि शहरांमधील सांडपाणी नदीत सोडणे.असे प्रकार आजही पाचवीला पुजलेले आहेत. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. ही स्वच्छता दूर झाली तरच माणसाचे आरोग्य उत्तम राहील. आरोग्याचा प्रश्न सोडवण्यासाठी दिल्लीपासून ते गल्लीपर्यंत सरकारची आरोग्य यंत्रणा आहे. त्यासाठी स्वच्छता हा स्वतंत्र विभाग असून त्याकरिता स्वतंत्र अधिकारी आणि स्टाप असतो. शहरांची जबाबदारी महापालिका, नगर पालिका, नगर परिषद तर ग्रामीण भागाची ग्रामपंचायत, तालुका पंचायत समिती यांची असते. आरोग्य खात्यावर मोठ्या निधीची अर्थसंकल्पात तरतूद केली जाते. तरीही अस्वच्छता प्रश्न इतका गंभीर कसा होत चालला आहे? या सर्वसामान्यांच्या मनातील प्रश्नाचे उत्तर आजही सापडत नाहीय. आज एखाद्या शहरात गेलात तर रस्ते थुंकीने माखलेले असतात. सार्वजनिक व सरकारी कार्यालयांमधील भिंतीच्या कोपऱ्यांवर थुंकीच्या पिचकाऱ्याच असतात. ग्रामीण भागात गेलात तर आजही उघड्यावर शौचास बसलेले असतात. घरोघरी शौचालयासाठी अनुदान देऊनही उघड्यावर नैसर्गिक विधी होत असेल तर रोगराई का पसरणार नाही.गावागावातील सांडपाणी नदीत सोडले जाते. दूषित पाणी प्यायल्यावर आजार का येणार नाहीत. यात संसर्गजन्य रोगराई आली तर ती माणसाच्या मुळावरच उठत असते. मग हे थांबणार कसे? स्वच्छता ही केवळ सरकारची जबाबदारी नाही तर राष्ट्रीय कर्तव्य म्हणून त्यात लोकांचाही सहभाग असला पाहिजे.सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका असे सरकार सांगत असले तरी आपण नियम पाळत नाही. आज कचरा उचलून नेण्यासाठी शहरांमध्ये गाड्यांची व्यवस्था लावल्यामुळे सार्वजनिक ठिकाणचा कचरा कमी होत चालला आहे. पण अजूनही अनेक ठिकाण चौकाचौकात घाणीचे साम्राज्य पहायला मिळते. ग्रामीण भागात अस्वच्छता गावात असते तर ग्रामसेवक घरी असतो. आपल्या महाराष्ट्रात संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबवले जाते. त्या दिवसापुरती स्वच्छता झाली की झाले. वर्षभर अस्वच्छताच. गांधीजींच्या जयंती दिनाची स्वच्छता मोहीम तशीच सुरू आहे. मोदींनी आवाहन केल्यानंतर खराटे हातात घेऊन जुजबी स्वच्छता करायची आणि निघून जायची. अशा ढोंगी स्वच्छता मोहिमांमुळे अस्वच्छतेची बजबजपुरी माजत चालली आहे. अशा मोहिमा काय उपयोगाच्या? 'बोलाचीच कढी, बोलाचाच भात' दुसरे काय?

वाढदिवस विशेष

# दिलदार व्यक्तीमत्व : दशरथ गोप

*प्रथमतः पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव व भारत राष्ट्र समितीचे सोलापूर शहर अध्यक्ष आदरणीय दशरथजी गोप साहेब यांना ५५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा परिचय...*

आजच्या दुनियेत वारसा हक्काने किंवा वंशपरंपरा असल्याशिवाय कोणीही सम्राट होणे जवळजवळ अशक्य आहे पण अशक्य ते शक्य करतील स्वामी या अक्कलकोट स्वामींच्या आशीर्वादानुसार अशक्य ते शक्य करण्याचे सामर्थ्य मा. दशरथ गोप यांना लाभलेले आहे.

आपल्या पूर्वजांनी निर्माण केलेल्या कोणत्याही साम्राज्यावर त्यांची पुढची पिढी निरंतर कोणत्याही पदावर राहणे हे सहज शक्य आहे पण समाजातील सर्व लोकांनी एकत्र येऊन निर्माण केलेल्या सहकारी संस्थेवर एक नाही दोन नाही तब्बल २८ ते २९ वर्षे सचिव पदावर राहून शैक्षणिक कार्यात योगदान देणारे सोलापुरातीलच नाही तर महाराष्ट्रातील कदाचित ते एकमेव उदाहरण असतील. एकीकडे काही खाजगी शिक्षण संस्था डबघाईला येत असताना गोप साहेबांनी आपले कला कौशल्य दाखवून संस्थेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विद्यार्थी संख्या व संस्थेतील एकही शिक्षक अतिरिक्त होणार नाही याची जबरदस्त काळजी घेतली आहे.

आदरणीय गोप साहेबांच्या शैक्षणिक कार्याचा दबदबा एवढा मोठा आहे की, त्यांच्या या कार्याची पावती म्हणून सोलापुरातील शिक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक संघटनेच्या पदावर ते कार्यरत आहेत. २९ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे योगदान व त्यापूर्वी पद्मशाली युवक संघटनेतील त्यांचं कार्यकर्तृत्व बघून भारत राष्ट्र समितीचे सर्वे सर्वा आदरणीय के. चंद्रशेखर राव यांनी त्यांना भारत राष्ट्र समिती पक्षाचे सोलापूर शहर अध्यक्ष केले आणि येथून गोप साहेबांचे प्रत्यक्षरीत्या राजकारणातील राजकीय कार्य सुरू झाले.



तसे पाहता श्री गोप साहेबांना प्रत्यक्ष राजकारणात कधीही रस नव्हता पण गेल्या काही वर्षात त्यांना असे लक्षात आले की सोलापुरातील पद्मशाली समाजातील लोकांचे, ज्ञाती संस्था व शिक्षण संस्थेशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी कोणीही राजकीय वाली नसल्याने अनेक महत्त्वाचे कामे प्रलंबित आहेत आणि राजकीय आश्रयाशिवाय हे केवळ अशक्य आहे म्हणून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. या लेखाच्या निमित्ताने पुन्हा एकदा गोप साहेबांना त्यांच्या राजकीय कारकिर्दीसाठी मनापासून खूप खूप शुभेच्छा.

आतापर्यंत साहेबांनी आपल्या कारकिर्दीमध्ये संस्था संचलित इप्पाकायल प्राथमिक शाळा व ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाची भली मोठी वास्तू उभी केली. राजमल बोमड्याल या प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्येच्या तुलनेत अपुऱ्या वर्ग खोल्या बघून त्याठिकाणीही भूमिपूजन करून मोठी वास्तू उभारण्याचे नियोजन केले तसेच या संस्था संचलित एकमेव इंग्रजी माध्यमाची शाळा असलेली डी. आर. श्रीराम इंग्लिश मीडियम स्कूलच्या, विद्यार्थ्यांची वाढती संख्या व इंग्रजी माध्यमातून आपल्या पाल्याला शिक्षण देण्याचा पालकांचा वाढता कल व तसेच इंग्रजी माध्यमातून महाविद्यालयीन शिक्षणाची गरज लक्षात घेऊन संस्थेतील सर्वात मोठी वास्तू उभारण्याचे संकल्प करून त्या कामाची सुरुवात देखील करून दिली.

अशा या दिलदार व्यक्तिमत्त्वाच्या गोप साहेबांचे अनेक वैशिष्ट्य आहेत त्यातीलच एक म्हणजे 'एक बार मैंने कमिटमेंट कर दी तो मैं अपने आपकी भी नही सुनता' किंवा (ओक्क सारी कमिट अयते ना माटा नीने विननू) या डायलॉगप्रमाणे साहेबांनी एकदा शब्द टाकलं तर ते प्रमाण होत असतं तसेच साहेबांनी एखाद्या व्यक्तीला एखादा शब्द दिला तर ते कोणत्याही परिस्थितीत शब्द फिरवत नाहीत. तसं त्यांच्या बाबतीत लिहायला बसलं तर एक मोठं पुस्तक तयार होईल.

'क्या लिखू आप के बारे में । किताबों के. पन्ने कम पड़ेंगे । बिना कुछ लिखे ही जहां, शीश झुके हरदम पड़ेंगे

वयाच्या १९ वर्षापासून पद्मशाली युवक संघटनेतील कार्य, वयाच्या २४ व्या वर्षापासून पद्मशाली शिक्षण संस्थेतील शैक्षणिक कार्य आणि आता मागील काही वर्षांपासून राजकीय कार्य, हे सर्व कार्य करीत असताना सांसारिक प्रपंच कशा पद्धतीने सांभाळावे हे सुद्धा साहेबांकडून शिकण्यासारखे आहे, त्यांची प्रिय कन्या प्रणोती हिने विदेशात एरोनॉटिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले आहे तर तर चिरंजीव वेदांत याने बीबीएचे शिक्षण पूर्ण केलेले आहे आणि अर्थात या सर्व कार्यासाठी घरातून खंबीर साथ दिलेली आहे ती त्यांच्या सुविद्य पत्नी विद्या वहिनी यांनी तसेच या सर्व कार्यासाठी सोबत त्यांच्या आई वडिलांचे संस्कार आहेतच. शेवटी जाता जाता एवढंच म्हणेन,

**'एक दुआ मांगते है हम**
**अपने भगवान से**
**चाहते हैं आपकी खुशी**
**पुरी ईमान से**
**सब हसरतें पुरी हो आपकी**
**और आप मुस्कुराएं दिलों जान से'** पुन्हा एकदा आदरणीय दशरथजी गोप साहेब यांना ५५ व्या वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा.

**- बाळकृष्ण गोंटीपामूल.**
(उपप्राचार्य सौ. भू. म. पुल्ली कन्या कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर)

जयंतीनिमित्त

# म. गांधीजींची आदर्शवत शिक्षण प्रणाली

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रपिता म. गांधीजींचे योगदान फार मोलाचू आहेत. त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा विशेष ठसा उमटविला आहे. ते थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, राजकीय विचारवंत, अस्पृश्यांचे उद्धारक, धर्मवक्ते, अर्थतज्ञ म्हणूनही ओळखले जातात. आचार्य विनोबा भावेंच्या मते, ''भगवान गौतम बुद्धानंतर सत्य, अहिंसेचा दुसरा एवढा मोठा पुजारी झाला नाही.' सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने लढा देणारे ते पहिले क्रांतिकारक होते. त्यांच्यावर थोरो, रस्कीन, टॉलस्टॉय यांच्या विचारांचा फार मोठा पगडा होता. महात्मा गांधीजींचे धार्मिक, शैक्षणिक विचार आधुनिक काळातील समाजव्यवस्थेला आजही आदर्शवत आहेत. गांधीप्रणित शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी हा केंद्रीभूत मानण्यात आला आहे. विद्यार्थ्यांतील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांच्या आवडी-निवडी, कल अभिरुचीचा विचार करुन शिक्षकाने केवळ मार्गदर्शकाची भूमिका बजावावी ही होती. त्यांचे शैक्षणिक विचार वर्धा योजना, मुलोद्योगी शिक्षण, बुनियादी शिक्षण, जीवन शिक्षण, नई तालीम या नावांनी ओळखले जातात. खरे तर गांधीजींच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानात निसर्गवाद, आधिर्वाद, वास्तववाद व कार्यवाह या चारही तत्त्वांचा समन्वय दिसून येतो. शिक्षण हे सामाजिक बदलाचे महत्त्वपूर्ण साधन असून समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य करते. हा महत्त्वपूर्ण विचार त्यांनी मांडला. गांधीजींच्या मते, 'शिक्षण हे फक्त पुस्तकी नको तर मनुष्याची बुद्धी, शरीर, हृदय या तिन्हींमध्ये योग्य तो समतोल विकास साधला गेला पाहिजे.''

महात्मा गांधीजींच्या शिक्षणाची उद्दिष्ट्ये ही सर्वांगिण विकासाची होती. शिक्षणामुळे विद्यार्थी स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनला पाहिजे. शिक्षणामुळे विद्यार्थी चारित्र्यसंपन्न झाला पाहिजे. छोट्या बालकांना मुळाक्षरांची ओळख करुन देण्यापेक्षा शिक्षकांनी त्यांना तोंडी ज्ञान दिले पाहिजे. शिक्षक हा केवळ ज्ञानदान करणारा नसावा तर विद्यार्थ्यांच्यात सत्य, सहिष्णुता व सहानुभूती निर्माण करणारा असावा. भारतातील स्त्री ही रुढी व अन्यायामुळे निरक्षर राहिली असून स्त्री शिक्षणाकरिता वेगवेगळ्या प्रभावी योजना आखल्या पाहिजेत. प्रौढांमध्ये अंधश्रद्धा, निरक्षरता, अज्ञान आणि व्यावहारिक ज्ञानाची कमतरता असल्याने स्वराज्याच्या निर्मितीसाठी प्रौढ शिक्षण दिले गेले पाहिजे. तरुण मुलां-मुलींना ज्ञानेंद्रियांचे कार्य व त्याचा उपयोग याविषयी माहिती देणे गरजेचे आहे की, ज्यामुळे कामवासनेवर विजय मिळविता येईल.

गांधीजींच्या मते, शिक्षणामध्ये व्यक्ती आणि समाज यांची ध्येये एकमेकांस पूरक असली पाहिजेत. जे शिक्षण आपण विद्यार्थ्यांना देणार आहोत, ते सामाजिक वातावरणास पूरक असले पाहिजे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण झाली पाहिजे. गांधीजी हे समन्वयवादी होते, त्यामुळे त्यांनी आदर्शाला व्यावहारिकतेची जोड दिली



होती. कल्पनेच्या विचारांची मांडणी, करण्यापेक्षा त्यांनी सतत व्यवस्थेचे भान ठेवले होते. येथील माती आणि माणसांची असणारी मानसिकता तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक पार्श्वभूमी त्यांना ज्ञात होती. येथील परिस्थितीत परिवर्तन करण्याचा राजमार्ग शिक्षणाच्या महाद्वारातून जातो. याची जाण त्यांना होती. शिक्षण क्षेत्राची प्रगती साधण्याबरोबरच विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी, अभ्यासक्रमात व्यायाम, खेळ, व्यवसाय, चित्रकला आणि संगीताचा समावेश असला पाहिजे, अशी त्यांची आग्रही भूमिका होती. शिक्षण पद्धतीत मातीकाम, बागकाम, हस्तकला, सुतकताई, विणकाम, शेती, पुस्तक बांधणी अशा कृतीयुक्त उपक्रमांचा समावेश केला होता. परिसर स्वच्छता, शाळेची स्वच्छता हेही महत्त्वाचे उपक्रम अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आले होते. शिक्षण हे आनंददायी व हसत खेळत व्हावे, ही त्यांची आग्रही भूमिका होती. उच्च शिक्षणामध्ये उद्योग, व्यापार, तांत्रिक, कला, उच्च साहित्य, विविध प्रकारची शास्त्रे इ. चा समावेश असावा जेणेकरुन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करता येईल. महाविद्यालये व विद्यापीठे ही पवित्र मंदिरे असून ती चारित्र्य संवर्धनाची केंद्रे निर्माण झाली पाहिजेत. केवळ पदवी मिळविण्यापुरते शिक्षण न घेता काहीतरी समाजोपयोगी नवे शोधण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे, अशी त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. विद्यार्थ्यांविषयीची भूमिका स्पष्ट करताना गांधीजी म्हणतात, 'आजचा विद्यार्थी हा उद्याचा भावी नागरिक असल्याने अतिशय जबाबदारीने वागले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या समग्र विकासाचा विचार गांधीजींनी त्यांच्या शिक्षण पद्धतीत केला. विद्यार्थ्यांनी जातीभेद, अस्पृश्यतेला थारा न देता गरजूंना मदत करावी, रुग्णांची सेवा करावी. धार्मिक तेढ किंवा दंगेधोपे झाल्यास अहिंसात्मक पद्धतीने समजविण्याचा प्रयत्न करावा. महिलांशी सौजन्याने वागावे, व्यसनांपासून त्यांनी स्वत:ला दूर ठेवावे.'

आजच्या जागतिकीकरणाने शिक्षणाचे क्रयवस्तूत रुपांतर झाले आहे. ढासळलेल्या शिक्षण प्रणालीत जीवनाधारित, स्वावलंबी शिक्षण पद्धतीची गरज आहे. संगणकाच्या या युगात प्रत्येक काम एका क्लिकवर आधारित झाले आहे. मात्र मानवी नीतीमूल्येही याच मातीत मान टाकून मरत आहेत. शिक्षण हे केवळ आर्थिकक लाभ मिळविण्याचे साधन नसून ते समाजपरिवर्तनाचे माध्यम आहे. याचाही विचार प्रशिक्षक प्रणालीत होणे गरजेचे आहे, महात्मा गांधीजींची केंद्रीय शिक्षण प्रणाली यामध्ये निश्चितच आदर्शवत ठरेल.

**- प्रा. डॉ. शंकर राजे,**
ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

जन्म हा अखेरचा

## शुश्रूषुस्थल - ३



कोणाच्या साक्षात्काराने मुक्ती मिळते? असा तिसरा प्रश्न आहे. त्याचे उत्तर पुढे देतात,

**शिवोऽहमिति भावेन शिवे साक्षात्कृते स्थिरम् ।**
**मुक्तो भवति संसारान्मोहग्रंथेर्विभेदत्तः ।।१७.७८।।**

शिवज्ञान झाल्यानेच मुक्ती मिळते. मी शिवच आहे आणि शिवावाचून दुसरे काही अस्तित्वात नाही हे ज्ञान शिवज्ञान होय. शिवज्ञानाच्या प्राप्तीसाठी कैलासात जाण्याची गरज नाही. तुमचे शरीरच कैलास होऊन जाते. ज्या शरीरात शिवाचा साक्षात्कार होतो ते शरीर कैलास होते. ज्याप्रमाणे प्रत्येक बीजात अंकुर विद्यमान असतो, त्याप्रमाणे प्रत्येक शरीरात भगवान शिवाचे आत्मरुपाने वास्तव्य असते. आपण शिवाला शोधतो, मंदिरात आणि तीर्थक्षेत्रात. परंतु आपले शरीर देखील एक क्षेत्रच आहे याचं आपल्याला भान नसते. जिथे भगवंताचे वास्तव्य असते, त्या स्थळाला 'क्षेत्र' अशी संज्ञा आहे. आपल्या शरीरात देखील भगवंताचे वास्तव्य असते, म्हणून शरीर हे क्षेत्र होय. अणूपरमाणूत सर्वत्र परमात्मा व्याप्त आहे. परंतु ज्ञानदृष्टी नसल्यामुळे सर्वत्र सोडाच, मंदिरात देखील त्याचे दर्शन आपल्याला होत नाही. मी शिव आहे असे ज्ञान दृढ झाल्यावर मोहग्रंथी नष्ट होते. विवेकशून्यतेचेच दुसरे नाव 'मोह' हे आहे. शरीर म्हणजे मी आहे असे मानून शरीराचे कोडकौतुक करणे म्हणजे मोह. आत्मरुपाचे ज्ञान झाले तरच शरीराचा मोह सुटू शकतो. परंतु मनुष्य मात्र देहाचे कोडकौतुक करण्यातच गुंतून पडलेला असतो.

प्रत्येक जीवाचा जन्म ब्राह्मणकुळात होतो. ब्रह्म जाणणारा तो ब्राह्मण होय. मनुष्याचा जन्म ब्रह्म जाणण्यासाठी झालेला आहे. पण तो ब्राह्मणाचे काम करीत नाही तर धोब्याचे काम करतो. धोबी ज्याप्रमाणे दुसऱ्याचे कपडे धुत बसतो, त्याप्रमाणे मनुष्यदेखील जन्मभर आपल्या शरीराची निगा राखत असतो. ब्राह्मणकुळात जन्म घेऊन देखील तो धोब्याचे काम करीत असतो. एखाद्या चर्मकाराला कातडे पाहिल्यावर ते कातडे ज्या देहावर होते, त्या देहाची नश्वरता पटते. त्याप्रमाणे शरीरात असलेल्या मांस, मज्जा, अस्थी यांचा विचार केल्यावर शरीरापलिकडे असलेल्या आत्म्याचे भान येते. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

### स्थानिक भाषेला प्राधान्य देणे कधीही हिताचे !

कोर्ट कचेरीत पैसा खर्च करण्यापेक्षा मराठी पाट्यांसाठी पैसे खर्च करा, असा बहुमोल सल्ला सर्वोच्च न्यायालयाने मुंबईतील व्यापारी संघटनेला दिलेला आहे तो निश्चितच स्वागतार्ह आहे. इतकंच नव्हे तर येत्या दसरा-दिवाळीच्या पार्श्वभूमीवर दोन महिन्यांत ग्राहकांना आकर्षित करण्याची ही नामी संधी असल्याचंही याचिकाकर्त्यांना सुचवलं आहे. त्यामुळे पुढील दोन महिन्यांत मुंबईसह राज्यभरातील सर्व दुकानं आणि आस्थापनांवर मराठी पाट्या दिसण्यास सुरुवात होईल अशी अपेक्षा आहे.

राज्य सरकारने सन २०२२ मध्ये मराठी पाट्या सक्तीच्या करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाविरोधात व्यापारी संघटनांनी आधी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तिथे निराशा पदरी पडल्यावर त्यांनी आता सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. महाराष्ट्र सरकारने जर स्थानिक भाषेला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला असेल तर तिथे व्यवसाय करताना व्यापाऱ्यांना तो मान्य करायला काय हरकत आहे, शेवटी ग्राहक हे तिथले स्थानिक रहिवासी असणार आहेत. मुळात ज्या राज्याची जी भाषा आहे त्या भाषेत दुकानं, आस्थापनं ह्यांच्यावर त्या भाषेत पाट्या असायला हव्यात इतका साधा नियम असताना, त्याला विरोध करून इथल्या मूठभर व्यापाऱ्यांनी हा लढा न्यायालयात का नेला?

महाराष्ट्रात असाल तर मराठीत इतर राज्यात असाल तर तिथल्या भाषेत पाट्या असणं किंवा त्या ठिकाणी त्या भाषेचा सन्मान करणं ह्यात विरोध करण्यासारखं काय होतं. तुम्ही जर व्यापारासाठी इथे महाराष्ट्रात येता तर इथल्या भाषेचा सन्मान केलाच पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने पण ह्यावर काही मूठभर व्यापाऱ्यांना चपराक दिली आहे. महाराष्ट्रातल्या प्रत्येक दुकानावर आणि आस्थापनांवर ठळक मराठी भाषेतील पाटी हवी म्हणजे हवी, आणि हे पाहणं आता महापालिका प्रशासन आणि काही प्रमाणात पोलीस प्रशासनाचं काम आहे !

**- राजू जाधव,**
**मांगूर, जि. बेळगांव.**

### उपाययोजनांची गरज

बेरोजगारी कमी करण्यासाठी उपाययोजनांची गरज असून प्रापंचिक खर्च भागेल असा समाधानकारक पगार मिळाला तर बरेच प्रश्न सुटतील असे वाटते. त्याशिवाय संतापाच्या भरात जुन्या कुरापती काढून होणारे गुन्हे पाहता सामंजस्य, सद्भावना हे शब्द कुठे हरवले?

**- प्र. मु. काळे, नाशिक.**



## - संतविचार -

डॉ. देविदास गुरव, सोलापूर

**रंगा येई वो ये । रंगा येई वो ये ।।**
**विठाई विठाई । माझे कृष्णाई कान्हाई ।।**
**वैकुंठवासिनि विठाई जगत्रजननी ।**
**तुझा वेधु माझे मनी । रंगा येई वो ये ।।**
**कटी कर विराजित । मुकुट रत्नजडित**
**पींताबरु विश्वंभरे । कमळनयने कमळाकरे वो**
**तुझे ध्यान लागो । बाप रखुमादेविवरे वो'**

संत ज्ञानेश्वरांच्या अंतरंगातील भक्ती आणि वात्सल्य यांचा सुंदर समन्वय या रचनेत पाहावयास मिळतो. विश्वाच्या ब्रह्मरूपाला मातृरूपात पाहण्याची उत्कंठा व त्यासाठी मनाची 'परिपूर्ण तयारी' माऊलीच्या ठायी किती होती याचे प्रत्यंतर येते. लडिवाळ आवाहन करताना ते म्हणतात, 'हे विठाई! विठू माऊली! माझ्या कृष्णाई, कान्हाई भजनाच्या रंगात तू रंगून ये! हे वैकुंठात वास करणारी विठाई तू त्रिजगताची माता आहेस. अनंत दिवसापासून तुझाच वेध माझ्या मनाला लागलेला आहे. कमरेवर हात ठेवून तू उभी आहेस, डोईवर रत्नजडित मुकुट आहे, कासेला पीतांबर आहे, याच रूपात तू धावत ये! हे! विश्वमाते, विश्वंभरे, कमलनयने, कमलाकरे, तुझेच ध्यान माझ्या चित्ताला लागू दे! पहा ! विठू माउलीस साद घालताना ज्ञानदेव जाणीवपूर्वक भावनिक नाते जोडत आहे. मातृरुपाचे हे नाते विणत जणू बालहट्टच धरला आहे.

आज 'समाजाचा' एखाद्या स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन किती 'वेगळा' असतो. परंतु तिच्याकडे माता म्हणून कितीजण पाहतात? स्त्री 'पृथ्वी'सारखी असते. लेकराचे सारे अपराध पोटात घालत असते. सर्जकता, क्षमाशीलता, सहनशीलता मातेच्या ठिकाणीच असते. म्हणूनच संतांनी निर्गुण निराकार परतत्वाला मातृरूपात पाहिले आहे. संत नामदेवांची

### 'विठाई विठाई माझे कृष्णाई'

ही रचना पाहा ना! **'विठ्ठल माउली कृपेचि सावली**
**आठविता घाली प्रेम पान्हा**
**न सांगता सर्व जाणे ताहन भूक'**

कृपेची प्रेमळ सावली देणारी ही विठू माउली सर्व जाणते, तिला काहीच सांगावे लागत नाही. लेकराच्या मनात काय आहे हे ती न सांगताच ओळखते. **'मायबाप माझा सोयरा जिवलग**
**तूचि पांडुरंग मजलागी ।**
**माझियेकारणे पुरविले धन**
**केले माझे संरक्षण मायबापा'**

नाथ माऊलींनीही तशीच भावना व्यक्त केली आहे. भक्ताची काळजी करणारा मायबाप पांडुरंग हाच सखा, सोयरा नि जिवलग आहे.

**'विठ्ठल माझी माय । आम्हां सुखा उणे काय'**

माझी माय विठ्ठल माझ्या सोबत असेल तर सुखाची उणीव भासणार आहे काय? एवढे मातृत्व नि पितृत्व त्याच्या ठिकाणी भरून उरला आहे. संत तुकोबांच्या दृष्टीने विठ्ठल म्हणजे वात्सल्याचा, मायेचा ठेवा आहे. त्यामुळे कोणत्याही उणीवाची भावना आमच्या मनात येणार नाही. संत जनाबाईने तर 'विठू माझा लेकुरवाळा' असे म्हटले आहे त्यामागे आईचे वात्सल्य हेच आहे. ती वात्सल्य दृष्टी या




विठ्ठलाकडे आहे. त्यामुळेच आम्हां बाळांचे कोडकौतुक करत आहे.

आई नि बाळ यांच्यातील देणंघेणं निर्हेतुक असतं तद्वत आईचं आईपण लेवून विठाई आपल्या 'बाळांना' कृपेची सावली प्रदान करत आहे. विठाबाई, कृष्णाई, कान्हाई, विठाई, किठाई, विठ्ठलाई इ. संबोधनाने व विश्वंभरे, कमलनयने, कमळाकरे अशा विशेषणाने सबंध संतवाणीत मातृप्रेमाचा प्रेमपान्हा पुनः पुन्हा अनुभवयास मिळतो नि आपणही त्या वात्सल्याच्या आनंदात न्हाऊन निघतो.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अभिवादन



म.गांधी जयंती निमित्त अभिवादन



लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त अभिवादन

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २ ऑक्टोबर २०२३ |



## कुर्डूवाडी येथे तलवार आणि कोयत्याने हल्ला

**सोलापूर** : पैगंबर जयंतीच्या वेळी रागाने बघितल्याच्या कारणावरून तलवार, कोयता आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत ३५ वर्षीय इसम गंभीर जखमी झाले. ही घटना कुर्डूवाडी (ता.माढा) येथे आज रविवारी दुपारच्या सुमारास घडली. साबीर कादिर चाऊस (वय ३५ रा. कुर्डूवाडी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्यांना कुर्डूवाडी येथे प्राथमिक उपचार करून गंभीर अवस्थेत सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. चाऊस हे आज दुपारी घराजवळ थांबले होते. त्यावेळी समीर मुलाणी, अश्फाक तौकन व अन्य तिघा जणांनी मिळून त्यांना मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# गुरू-शिष्यांमध्ये मनोमिलन? सोलापुरातच घडला योगायोग

सुराज्य/मोहोळ

**मोहोळ विधानसभा मतदार संघातील राजकारणात काही वर्षांपूर्वी गुरू-शिष्याचे नाते असणाऱ्या दोन नेत्यांमधील कटुता संपली असून त्यांच्यात पुन्हा मनोमिलन झाल्याची चर्चा आहे.त्यामुळे आगामी काळात मोहोळच्या राजकारणाची दिशा बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. राजकारणात कोण कुणाचा कधी शत्रू होईल? कोण कुणाचा कधी शत्रू होईल,याचा नेम नाही.ही व्याख्या आता सर्वसामान्यांनाही पाठ झाली आहे.तेव्हा मोहोळ तालुका त्याला अपवाद कसा असू शकेल? माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे आणि माजी आमदार रमेश कदम या गुरू-शिष्यांमध्ये सोलापूरच्या साक्षीने एकोपा झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.**

मोहोळच्या राजकारणात ढोबळेंनी आमदारकी जिंकून आपले बस्तान बसवले होते. आपण एक चांगला कार्यकर्ता घडवून या भावनेने त्यांनी मूळचे अकलूजचे आणि बोरिवलीत स्थायिक झालेले कदम यांना मोहोळमध्ये आणले. वाघोली येथील सूत गिरणीची थोडी बहुत जबाबदारी दिली.जनसंपर्क आणि मेळावे यातून कदम यांचा तालुक्यात संपर्क वाढत गेला.यातूनच ढोबळे यांच्याकडे गुरू तर कदम यांच्याकडे शिष्य म्हणून पाहिले जावू लागले. पुढे कदम यांनी आमदारकीची तयारी सुरू केली.२०१४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून आरक्षित जागेवर कदम यांना उमेदवारी मिळाली.ढोबळेंचे पंख छाटण्यासाठी राष्ट्रवादीतील एका गटाने कदम यांना रसद पुरवली.ढोबळे यांनी अपक्ष म्हणून भवितव्य अजमावले पण मोहोळच्या जनतेने त्यांना नाकारले.कदम विजयी झाले.तिथेच गुरू शिष्याच्या नात्यात शत्रूत्व निर्माण झाले.

आमदारकी मिळाल्यानंतर कदम यांच्यामागे शुक्लकाष्ठ लागले. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळातील भ्रष्टाचार प्रकरणी त्यांना तुरूंगात जावे लागले.

तब्बल नऊ वर्षांनी कदम हे जामीनावर बाहेर आल्यानंतर गेल्याच आठवड्यात मोहोळमध्ये त्यांचे जंगी स्वागत झाले.गेल्या चार पाच दिवसात कदम हे मोहोळसह सोलापुरातील कार्यकर्त्यांना भेटत आहेत.

### अन् गहिवरून आले...

शनिवारी सोलापुरात योगायोग घडून आला. पार्क चौकात ढोबळे यांचे खादी भवनचे कार्यालय आहे. त्याचच खाली कदम हे कार्यकर्त्यांसमवेत एका कामासाठी थांबले होते. दरम्यान ढोबळे यांची गाडी तिथे आली. ढोबळेंनी कदमांना पाहिले.चला वरती म्हणत त्यांना आपल्या कार्यालयात नेले.कार्यालयात गप्पा रंगल्यानंतर दोघांनाही गहिवरून आले.

### राजकारणाची दिशा बदलणार

कदमांनी केलेले प्रामाणिक काम आजही तरुणाच्या स्मरणात राहीले आहे. म्हणूनच नुकत्याच झालेल्या त्यांच्या सभेला मोहोळ तालुक्यात इतिहास घडवण्या सारखी गर्दी झाली होती . आता ढोबळे हे भाजपवासी झाले आहेत तर कदमांनी अद्याप पक्ष ठरवला नाही . परंतु दोघांचे मनोमिलन झाल असल्याचे समजते . जर खरेच हे मनोमिलन झाले असेल तर मोहोळच्या राजकारणाची दिशा बदलणार का ? अशी चर्चा होवू लागली आहे.





## मनोज जरांगे यांचे शहरात जंगी स्वागत होणार

### मेळाव्याला दहा हजार समाजबांधवांना जमावण्याचा निर्धार

सुराज्य/सोलापूर

मराठा आरक्षणाचा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील हे येत्या गुरूवार, ५ ऑक्टोबर रोजी सोलापुरात येत असून त्यांचे अभूतपूर्व असे स्वागत करण्याचा निर्धार सकल मराठा समाजाच्या बैठकीत करण्यात आला.

रविवारी, शासकीय विश्रामगृहात जरांगे पाटील यांच्या सोलापूर दौर्याच्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाजाच्यावतीने आयोजित केलेल्या नियोजन बैठकीत जरांगे पाटील यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत करण्याचे ठरले. या बैठकीला मराठा समाजातील सर्वपक्षीय नेतेमंडळी उपस्थित होती.

५ ऑक्टोबर रोजी दुपारी दीड वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत मेळावा आयोजित करण्यात आला आहे. सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज चौकात जरांगे पाटील यांचे स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून मिरवणुकीने हुतात्मा स्मृती मंदिराकडे जाण्याचे ठरले आहे. या मार्गावरील सर्वच महामानवांना वंदन करण्यात येणार आहे.

दरम्यान, हुतात्मा स्मृती मंदिराची आसन व्यवस्था एक हजार लोकांची असली तरी बाहेर स्क्रीन लावण्यात येणार असल्याने सुमारे दहा हजार लोक या मेळाव्याला उपस्थित राहतील याद्दष्टीने नियोजन करण्यात येत असल्याचे सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांनी सांगितले. हा मेळावा ऐतिहासिक होणार असून लोक खूप मोठ्या संख्येने मेळाव्याला येणार आहेत. परंतु जागेअभावी अडचणी आहेत. पार्किंगची व्यवस्था पार्क चौक ते श्री सिध्देश्वर मंदिरापर्यंतच्या रस्त्यावर दोन्ही बाजुला करण्यात येणार असल्याचेही पवार यांनी सांगितले.

या बैठकीत पुरूषोत्तम बरडे, पद्माकर काळे, दत्तात्रय वानकर, राजन जाधव, विनोद भोसले, प्रा.गणेश देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. बैठकीस जयकुमार माने, श्रीकांत डांगे, प्रल्हाद काशिद, इंद्रजित पवार, संतोष भोसले, प्रकाश ननवरे, संतोष जाधव, प्रा.लक्ष्मण महाडिक, सुरेश जगताप, आप्पा सपाटे, दिनकर जगदाळे, महादेव गवळी, बाबासाहेब देशमुख, ब्रम्हदेव पवार, प्रताप कांचन, नंदा शिंदे, उमा बचुटे, मनिषा नलावडे, स्वाती पवार , निर्मला शेळवणे, उज्ज्वला साळुंखे यांच्यासह शहर व जिल्ह्यातील समाज बांधव मोठ्या संख्यने उपस्थित होते.

## दौंडमधून उजनीत येणारा विसर्ग पुन्हा वाढला

सुराज्य/टेंभुर्णी



सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातील पाणीसाठा वरचेवर वाढत चालला आहे.रविवारी सायंकाळच्या आकडेवारीनुसार दौंडमधून ३४ हजार क्युसेकचा विसर्ग धरणात येवून मिसळत आहे. टक्केवारी ३८.४० इतकी झाली आहे.

रविवारी सकाळच्या माहितीनुसार उजनी वरील १९ धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पुन्हा जोरदार पावसाला सुरुवात झाली. या धरणांपैकी विसापूर नाझरे हे प्रकल्प वगळता बाकी १५ धरणे शंभर टक्के भरली असून त्यापैकी १३ धरणांमधून ३६ हजार ४१९ क्यूसेक पाणी भीमा नदीत पाणी सोडण्यास सुरुवात केली आहे. भीमापात्रातील धरणांत होणाऱ्या धुवांधार पावसामुळे १५ प्रकल्प १०० टक्के भरले आहेत.

भीमाशंकर येथे होत असलेल्या पावसामुळे घोड व इंद्रायणी दुथडी भरुन वाहू लागल्याने त्याचाही लाभ उजनीला होणार आहे. रविवारी सकाळी दौंडमधून १५ हजार २९० चा विसर्ग उजनीत येत होता परंतु सायंकाळी त्यात मोठी वाढ झाली. त्यातच नीरा बेसिंग मधील ३ धरणे १००% झाल्यामुळे नीरा नदीत पाणी सोडले जाऊ शकते.

## ढकलून दिल्याने वृद्ध इसमाचा मृत्यू; गुन्हा दाखल

**सोलापूर** : किरकोळ तक्रारींवरून ढकलून दिल्याने ६५ वर्षीय वृद्ध इसम मरण पावले. ही घटना हुन्नूर (ता.मंगळवेढा) येथील मारुती मंदिराजवळ काल शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी एका विरुद्ध मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

प्रभाकर चेंदा शिंगाडे (वय ६५ रा.हुन्नुर)असे मयताचे नाव आहे. या प्रकरणात मंगळवेढाच्या पोलिसांनी संजय पांडुरंग पवार (वय ४५ रा.हुन्नुर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात मयत प्रभाकर यांचा मुलगा रामचंद्र शिंगाडे यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. शनिवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास गावातील मारुती मंदिराजवळ किरकोळ कारणावरून तक्रार झाली होती. यावेळी आरोपी संजय पवार याने आपले वडील प्रभाकर शिंगाडे यांना ढकलून दिले होते. त्यात ते गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाले. मयत प्रभाकर यांना दम्याच्या त्रास होता. ते आजारी असल्याचे माहीत असून देखील आरोपींने त्यांना ढकलून देऊन मृत्यूस कारणीभूत ठरला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. फौजदार शेख पुढील तपास करीत आहेत.

## सांगोल्याला अतिरिक्त दोन टीएमसी पाणी मंजूर : केदार-सावंत

सुराज्य/सांगोला

सांगोला तालुक्याचा पाणीप्रश्न कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील आणि टेंभू अधिकाऱ्यासोबत झालेल्या टेंभू योजनेच्या पाणी वाटपाच्या फेरनियोजन बैठकीत सांगोला तालुक्याला अतिरिक्त दोन टीएमसी पाणी मंजूर करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.



भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले की, सांगोला तालुक्याचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी टेंभू, म्हैसाळ, नीरा उजवा कालवा, उजनीचे दोन टीएमसी पाणी, जिहे कठापूर या सर्व सिंचन प्रकल्पातून पाणी सोडून हजारो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील आणि मी स्वतः कटिबद्ध आहोत. २०१९ पासून खासदार रणजितसिंह निंबाळकर आणि आमदार शहाजीबापू पाटील यांनी केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. नीरा उजवा कालव्याचे टेल टू हेड पद्धतीने पाणी सोडण्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी आदेश दिल्याने खरीप हंगामातील पिकांना जीवदान मिळाले आहे.

टेंभू उपसा सिंचन योजनेच्या फेरनियोजन पाणी वाटपाची बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील आणि टेंभूचे अधिकारी यांच्यात झाली. या फेरनियोजन बैठकीत सांगोला तालुक्याला टेंभू योजनेतून अतिरिक्त दोन टीएमसी पाणी देण्याचे देण्याचा निर्णय मंजूर झाला आहे. टेंभू योजनेतून माण नदीवरील बंधारे भरून देणार असल्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर म्हटल्याचे चेतनसिंह केदार-सावंत यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### खा.निंबाळकरांनी निवडणुकीत दिलेला शब्द पाळला



२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे खासदार रणजीतसिंह निंबाळकर यांनी २०२४ च्या निवडणुकीत पाण्याचा प्रश्न राहणार नाही असे आश्वासन दिले होते. त्यानुसार गेल्या पाच वर्षात खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी टेंभू, म्हैसाळ, निरा उजवा कालवा, कृष्णा भीमा स्थिरीकरण, जिहे कठापूर योजना, उजनीचे दोन टीएमसी पाणी या सर्व सिंचन प्रकल्पासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच या सर्व सिंचन प्रकल्पातून सांगोला तालुक्याला पाणी सोडण्यासाठी वारंवार पाठपुरावा केला आहे. २०१९ च्या निवडणुकीत मतदारांना दिलेल्या आश्वासनाचीपुर्ती करून खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी निवडणुकीत दिलेला शब्द पाळला आहे.

## पाय घसरून पडल्याने तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : पाणी भरताना पाय घसरून पडल्याने २६ वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मरण पावला. ही घटना मुस्ती (ता.दक्षिण सोलापूर) येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. प्रमोद करपे (वय २६ रा.मुस्ती) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे.

तो रात्री १० वाजता पाणी भरत होता. त्यावेळी पाय घसरून पडल्याने त्याच्या हनुवटीस मार लागून तो बेशुद्ध पडला होता . त्याला पंकज (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

## सराईत गुन्हेगार प्रेम राठोड एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध



**सोलापूर** : शहरातील विजापूर नाका पोलीस ठाणे हद्दीतील मागील अनेक वर्षांपासून घातक शस्त्रांचा वापर करून जबरी चोरी, चेंज स्नॅचिंग, वर्तनाची मंडळी जमवणे,दहशत वाजवणे, खंडणी मागून धमकी देणे असे अनेक गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार प्रेम रामचंद्र राठोड (वय-२९,रा. प्रताप नगर तांडा, उत्तर सोलापूर) याला एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करण्यात आले.

प्रेम राठोड याला त्याच्या गुन्हेगारी करण्यापासून परावृत्त करण्यासाठी सन २०१२ व २०१३ मध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या आहेत.त्यानंतरही त्याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही आणि त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा होईल अशी गुन्हेगारी कृत्य चालूच ठेवली.त्यामुळे पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी त्याच्या विरुद्ध स्थानबद्धतेचे आदेश काढत त्याची रवानगी पुणे येथील येरवडा कारागृहात केली.

## जखमी तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : इंडी (जि. विजयपूर) येथील सावतगाव परिसरात जखमी अवस्थेत आढळलेला प्रमोद अंबादास शेरला (वय ३२, रा.भवानी पेठ, सोलापूर) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शनिवारी रात्री मरण पावला. तो २६ सप्टेंबर रोजी सातलगाव येथे जखमी अवस्थेत सापडला होता. त्याला इंडी येथे उपचार करून शुक्रवारी सोलापुरात दाखल करण्यात आले होते. नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आज घरीच स्वच्छता अभियान राबवा!

## स्वच्छतेसाठी झटले लाखो हात; जिल्हाधिकाऱ्यांनी उचलला कचरा

सुराज्य/सोलापूर

**स्वच्छता ही सेवा मोहीम तालुक्यातील सर्व गावांमध्ये एक तारीख एक तास या मोहिमे खाली स्वच्छतेसाठी लाखो हात झटले. हजारो टन कचरा गोळा करणे बरोबर आबाल वृध्द, अपंग या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले. स्वच्छता मोहिमेत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी स्वत हातात. झाडू घेऊन परिसर स्वच्छ करत कचरा उचलला. घराबरोबर परिसर देखील स्वच्छ ठेवण्याचा संदेश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिला.**



स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत स्वच्छता ही सेवा हा उपक्रम १५ सप्टेंबर २ ऑक्टोबर २०२३ या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार १ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत जिल्हातील प्रत्येक तालुक्यामधील प्रत्येक गावात एक तास स्वच्छतेसाठी श्रमदान मोहीम राबविणेत आली.

जिल्हा स्तरावर घेणेत आलेले मोहिमेत जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे व पाणी व स्वच्छतेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, स्वच्छ भारत मिशन चे ब्रॅन्ड ॲम्बेसिडर सचिन खरात, शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी .कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, अधिक्षक अनिल जगताप, कक्ष अधिकारी विवेक लिंगराज, कक्ष अधिकारी अविनाश गोडसे, जिल्हा परिषदेतील युनियनचे डॉ. एस.पी माने,जहीर शेख, सचिन घोडके, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय बहुजन कर्मचारी संघटनेचे कोषाध्यक्ष संतोष जाधव, रणजित गव्हाणे,,सादिक शेख, राज उपासे ,वसंत काळे आदी कर्मचारी उपस्थित होते. जिल्हात ११ तालुक्यातील १०१९ ग्रामपंचायती मधील ११४१ गावाच स्वच्छता मोहिम राबविणेत आली आहे. अनेक ठिकाणी पडत्या पावसात श्रमदान केले. सर्व गटविकास अधिकारी यांनी गेल्या तीन दिवसा पासून चांगले नियोजन केले होते. त्यामुळे स्वच्छता श्रमदानाचा मेसेज सर्व लोका पर्संत जाणेस मदत झाली.

शहारात सिध्देश्वर मंदिराकडे जाणारे अडुसष्ठ लिंग पैकी जिल्हा परिषद आवारात असलेले ठिकाणी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांचे सह अधिकारी व कर्मचारी यांनी स्वच्छता केली. संत गाडगे बाबा की जय, स्वच्छ गाव सुंदर गाव, प्लास्टिक मुक्त गाव करा. स्वच्छ कार्यालय सुंदर कार्यालय या घोषणा यावेळी दिल्या.

मोहिम पार पाडल्या नंतर संविधान उद्देशीका स्तंभाजवळ अधिकारी व कर्मचारी यांचे समवेत स्वच्छतेवर घोषणा देत असताना एक दिव्यांगही घोषणा देत सहभागी झाले. ते जमिनीवर बसले असताना जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिव्यांगासाठी खुर्ची मागवून घेतली. स्वत उभा राहून स्वच्छतेच्या मोहिमेत सहभागी झाले. त्यांचे संवेदनशील तेची चर्चा परिसरात सुरू होती.

# शहरात ५२ ठिकाणी मोहिमेतून उचलला एकूण दीडशे टन कचरा

## शहरात एक तास स्वच्छतेसाठी उपक्रमाला प्रतिसाद : आजी – माजी लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केले श्रमदान

सुराज्य/सोलापूर

महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या औचित साधून स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने एक तास स्वच्छतेसाठी या अभियानात आज रविवारी अधिकारी, कर्मचारी, आजी - माजी लोकप्रतिनिधी व श्री सदस्यांसह ९ हजार २५६ जणांनी श्रमदान केले. या दरम्यान शहरात ५२ ठिकाणी साफसफाई करत एकूण १४५ टन कचरा उचलण्यात आला. यावेळी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी हातात झाडू घेऊन स्वच्छता केली. या मोहिमेस शहरात उत्स्फूर्त चांगला प्रतिसाद मिळाला.




स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छता ही सेवा हा उपक्रम दिनांक १५ सप्टेंबर २०२३ ते ०२ ऑक्टोबर २०२३ या कालावधीमध्ये स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार महापालिकेच्या वतीने महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित साधून आज दिनांक १ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी १० ते ११ वाजता या वेळेत सोलापूर शहरातील ५२ ठिकाणी एक तास स्वच्छतेसाठी ही मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेअंतर्गत सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने रविवारी रविवारी सकाळी १० वाजता महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) येथे या अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक वाहन नागनाथ मेंडगुळे, अनिल चाराटे आदी मान्यवर उपस्थित होते.

### सफाई कर्मचाऱ्यांसह घंटागाड्यांचे नियोजन

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने एसटी स्टँड, रेल्वे स्थानक, धार्मिक स्थळे, सार्वजनिक ठिकाणी तसेच प्रत्येक वार्डामध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. प्रत्येक वार्डामध्ये स्वतंत्र पथकाची नियुक्ती नेमण्यात आली तसेच अभियानानंतर कचरा उचलण्यासाठी सफाई कर्मचाऱ्यासह घंटागाड्याचे नियोजन करण्यात आले. शहरात ५२ ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली असून दीडशे टन कचरा उचलण्यात आला. यामध्ये ९ हजार २५६ मनपा अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच माजी नगरसेवक, माजी पदाधिकारी व धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्री सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### नेते- अधिकारी देखील सरसावले

यावेळी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या उपस्थितीत पूर्व मध्यमंडल भागात अशोक चौक परिसरातील स्वातंत्र्यवीर सावरकर पुतळा परिसर स्वच्छतेची मोहीम हाती घेतली. आमदार तथा बाजार समिती सभापती विजयकुमार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने स्वच्छता अभियान बाजार समिती मार्केट यार्ड परिसरात राबविण्यात आले. आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता मोहीम घेण्यात आली.

पोलीस आयुक्तालय परिसरामध्ये पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने, मनपा उपायुक्त आशिष लोकरे, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी विरोधी पक्षनेते अमोल शिंदे यांच्यासह सर्व पोलीस कर्मचाऱ्यांनी त्या ठिकाणी परिसर स्वच्छता केली. तुळजापूर रोड येथील हिंदू स्मशानभूमी मध्ये माजी नगरसेवक किरण देशमुख यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता मोहीम घेण्यात आली.

या ठिकाणी शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम , माजी सभागृह नेते संजय कोळी, राजकुमार पाटील, पांडुरंग दिड्डी, नागेश सरगम, सुनील गौडगाव, गिरीश बत्तुल, महेश बनसोडे, आनंद बिर्रू, उपसभापती श्रीशैल नरोळे, बसवराज इटकळे, सुरेश चिकळी, वैभव बरबडे, प्रभाकर विभुते, महालिंगप्पा परमशेट्टी , प्रकाश हत्ती, श्रीशैल अंबारे, जगदीश व्होड्रांव, योगेश हिरेमठ , फैज बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.



### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आवाहनाला युवासेनेचा प्रतिसाद

**सोलापूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या श्रमदानाद्वारे स्वच्छतेच्या आवाहनाला प्रतिसाद देत युवा सेनेतर्फे रविवारी गांधीनगर येथील मॉर्डन हायस्कूल परिसरात श्रमदान करत स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमाचे उद्घाटन शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे आणि युवा सेनेचे जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी युवा सैनिक आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत मुख्य रस्त्याची तसेच परिसराची स्वच्छता केली. या उपक्रमात शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे, युवा सेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, युवा सेना शहरप्रमुख अर्जुनसिंग शिवसिंगवाले, दीपक पाटील, उपशहर प्रमुख आशिष परदेशी, युवा सेना उपशहर प्रमुख अल्फान आबाजीराजे, अभिजीत काळे, अविनाश बेंजरपे, किरण पाटील, युवा सैनिक, मॉर्डन हायस्कूलमधील एनसीसीचे विद्यार्थी सहभागी झाले होते.



### श्रमदान एक मानसिक समाधानाचे कारण : चंद्रशेखर मंत्री

सोलापूर : स्वच्छता ही एक सेवा असून श्रमदान केल्याने एक मानसिक आणि शारीरिक समाधान मिळते असे मत सोलापूर बँक ऑफ इंडिया चे रिजनल ऑफिसर चंद्रशेखर मंत्री यांनी व्यक्त केले. सोलापूर शहरातील एम्प्लॉयमेंट चौकात असलेल्या सह्याद्री शॉपिंग सेंटर परिसरातील भागात श्रमदान हा कार्यक्रम बँक ऑफ इंडिया ने आयोजित केला होता त्यावेळी ते बोलत होते. या वेळी उप व्यवस्थापक अरूण प्रकाश, सहाय्यक महाप्रबंधक सत्यनारायण प्रसाद मुख्य प्रबंधक विजय सोनकुसरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी मुख्य प्रबंधक चेतन टाकले अजित देशमुख निधी शर्मा अग्रणी जिल्हा प्रबंधक प्रशांत नाशिककर अर्जुन कोणता सिद्धेश्वर कद्रे यांनी प्रयत्न केले.

### शहर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांचे योगदान महत्वाचे : घोडके

**सोलापूर :** कोणतेही काम एकीने केले की संकल्पसिध्दी होतेच सोलापूर शहर, जिल्हा स्वच्छ, निरोगी, व आरोग्य संपन्न ठेवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेपेक्षा नागरिकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे मत भागाईवाडीच्या माजी सरपंच कविता घोडके पाटील यांनी सांगितले. महानगरपालिकेच्या झोन ५ अंतर्गत प्रभाग ४५ मधील संभाजी तलाव येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी उपआयुक्त मच्छिंद्र घोलप, मुख्य आरोग्य अधिकारी मंजुनाथ बागेवाडीकर, सफाई अधिक्षक बिराजदार, अनिल चराटे, यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहिम नियोजनबद्ध राबवण्यात आली. यावेळी आरती आंटद, दिनेश अटंद, सर्वोत्तम कुलकर्णी, अमीत माने, सुपरवायझर प्रदीप चंदनशिवे, आदिचा सहभाग होता.



### स्वच्छता अभियानामध्ये प्रवासी संघटना सामिल

**सोलापूर :** शासनाच्या वतीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सोलापूर रेल्वे स्टेशनवर प्रवासी संघटनेच्या वतीने स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्रवासी संघटनेने सहभाग नोंदवला.

रेल्वे डब्यामध्ये, रेल्वे दादरवर, रेल्वे प्लॅटफॉर्म वर स्वच्छ भारत अभियान यशस्वीरित्या कार्यक्रम संपन्न झाले. रेल्वे मास्तर मीना साहेब म्हणाले सर्व नागरिक प्रवासी जसे घर, आंगण स्वच्छ ठेवतो तसेच सार्वजनिक ठिकाणी, रेल्वे स्टेशनवर प्रत्येकाने स्वच्छते विषयी आपली जबाबदारी सतर्कतेने पार पाडले पाहिजे. प्रमुख पाहुणे गौतम बनसोडे म्हणाले आपण घर, गाव, देश जसे स्वच्छ करू लागलो तसे स्वतःला स्वच्छ केले पाहिजे. यावेळी अध्यक्ष राजाभाऊ म्हणाले स्वच्छता अभियान राबून नुसते देशच स्वच्छ होणार नसून त्या मध्ये जनतेचे स्वास्थ्य स्वस्थ, निरोगी होणार आहे. हीच खरी काळाची गरज आहे. कार्यक्रमाला रेल्वे हेल्थ चीफ इन्स्पेक्टर बिराजदार साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन राजेंद्र कांबळे यांनी केले. आभार मयुरे भोज यांनी मानले. यावेळी गोरख जगदाळे, आसिफ शेख व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत एकत्रितपणे स्वच्छता अभियान

सुराज्य/सोलापूर

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार रविवारी १ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सर्व नागरिकांनी एकत्रितपणे १ तास स्वच्छता अभियानांतर्गत पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर आस्थापना अंतर्गत सर्व पोलीस ठाणे व शाखा प्रभारी अधिकारी यांनी आपले कार्यालयात/परिसरात स्थानिक महानगरपालिका, नगर परिषदा, नगरपालिका कार्यालयाकडील उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचे समन्वये श्रमदानातून स्वच्छता अभियान राबविले.

पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने, पोलीस उप-आयुक्त, (मुख्यालय) अजित बोऱ्हाडे, पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) डॉ. दिपाली काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, अशोक तोरडमल, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), श्रीमती प्रांजली सोनवणे व इतर पोलीस अधिकारी, अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी तसेच सोलापूर महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत पोलीस आयुक्त कार्यालय व परिसरात स्वच्छता अभियान उपक्रम राबवून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला.

पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर अंतर्गत असलेले पोलीस ठाणे, शाखा, पोलीस मुख्यालयाकडील पोलीस अधिकारी व अंमलदार ज्यांचे त्यांचे कार्यक्षेत्रातील परिसरात दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करुन स्वच्छता अभियान उपक्रम राबवला




### बालाजी अमाईन्सतर्फे स्वच्छता मोहीम

**सोलापूर :** बालाजी अमाईन्स व हॉटेल बालाजी सरोवरतर्फे स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. स्वच्छ भारत हीच आपल्या देशाने महात्मा गांधीजी यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अर्पण केलेली सर्वोत्तम श्रद्धांजली ठरेल, असे बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी रामरेड्डी यांनी सांगितले.

रविवारी सकाळी बालाजी अमाईन्स लि. व हॉटेल बालाजी सरोवर प्रिमियर, बालाजी स्पेशालिटी केमिकल् लि तसेच तिरुमला प्रेसिकास्ट या बालाजी ग्रुप च्या कंपन्या तील सुमारे २०० कर्मचारी व अधिकारी वर्गाने सहभाग घेत . महावीर चौक ते मुलतानी फॅक्टरी होटगी रोड परिसरात स्वच्छता अभियान राबवले. स्वताः रामरेड्डी यांनी २ तास सहभाग घेतला. कार्यक्रमास तिरुमला प्रेसिका स्ट कंपनीचे चंद्रशेखर रेड्डी, बालाजी अमाईनचे मल्लिनाथ बिराजदार, अरुण मासळ, सादिक पटेल, शबाना तांबोळी, वर्षा गुंटूक, पवन ताटी, विनोद चुंगे, सचिन मोरे 'असिफ कोतवाल सरोवर चे ब्रिजेश सिंघ साजन नटराजन तोळणूर निलगंगा कासे .दिवाकर गोसावी , दत्तप्रसाद सांजेकर सर्व ग्रुपचे कर्मचारी उपस्थित होते.

### नेहरु युवा केंद्रात स्वच्छता दिन साजरा

**सोलापूर :** नेहरु युवा केंद्र येथे स्वच्छता दिन साजरा करण्यात आला. यावेळी येथील परिसरातील साफसफाई नेहरु युवा केंद्रातील तालुका समन्वयकांनी व व्यसनमुक्ती केंद्रातील कर्मचारी ओल कचरा व सुखी कचरा गोळा करुन तो नगरपालिकेच्या कचरा कुंडीमध्ये टाकण्यात आला. यावेळी स्वच्छ भारत, समृध्द भारत हा नाराही दिला. यावेळी अनिल हिंगे, मधुकर चव्हाण, हणमंत पाचढवळे, श्रीकांत बनसोडे, बापू वारे, गणेश माळी, विशाल घंटे उपस्थित होते.

### दक्षिण भाजप पदाधिकाऱ्यांचा स्वच्छता मोहिमेत सहभाग

**सोलापूर :** पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा पंधरवडा अंतर्गत *स्वच्छता ही सेवा, एक तारीख, एक तास एकत्र या अभियानात सेवा पंधरवडानिमित्त दक्षिण सोलापूर भाजपच्यावतीने आमदार सुभाष देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या उपक्रमाचे आयोजन दक्षिण -पूर्व मंडल कुमठा नाका, म्हेत्रे वस्ती परिसरात स्वच्छता मोहीम करण्यात आले.या स्वच्छता अभियानामध्ये प्रमुख उपस्थिती भाजपा जिल्हा सरचिटणीस मनीष देशमुख, सरचिटणीस विशाल गायकवाड, संयोजक दक्षिण पूर्व मंडलध्यक्ष अर्जुन जाधव, नागनाथ शिवशिंगवाले, शिवशरण बब्बे, श्रीनिवास पुरुड, आदित्य हुचे, महेश बनसोडे, हमींद सय्यद, शब्बीर शेख, अंबादास पामू, यशवंत हिरापुरे, धर्मराज पाटील, राजेश शिवसिंगवाले, घनश्याम शिवसिंगवले, सतीश सुरवसे, शाम काकी, सुनील कांबळे, गौतम पारवे, विठ्ठल झिपरे, संजय शिवशरण आदींचा सहभाग होता.




### आशा विद्यालयात स्वच्छ भारत अभियान

**सोलापूर :** नीलमनगर भाग ३ व ४ येथील रणजितसिंह मोहिते-पाटील बालक मंदिर, आशा मराठी विद्यालय व श्री धर्मण्णा सादूल प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छ भारत अभियान राबविण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेऊन शालेय परिसर स्वच्छ करण्याचे कार्य पार पडले.

# माणुसकी व जिव्हाळा संपत चालला आहे

## डॉ. विश्वनाथ शिंदे यांचे प्रतिपादन : गोविंद काळे लिखित हिडन मेजरमेंट कांदबरीचे प्रकाशन

सुराज्य/सोलापूर

सध्या माणसातील माणुसकी व जिव्हाळा संपत चालला असून माणूस एकमेकांवर कुरघोड्या करून शत्रूप्रमाणे वागत आहे, अशी खंत महात्मा फुले अध्यासन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.




महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा सोलापूर व नरेंद्र काळे मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गोविंद काळे लिखित हिडन मेजरमेंट' या कादंबरीच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी ते बोलत होते. या वेळी मंचावर मसापच्या अध्यक्षा डॉ. श्रुती श्री. वडगबाळकर, उपाध्यक्ष दत्ताअण्णाा सुरवसे, दै. सकाळ चे वरिष्ठ पत्रकार रजनीश जोशी, भाजपचे सोलापूर शहर अध्यक्ष नरेंद्र काळे उपस्थित होते.

या वेळी बोलताना ते म्हणाले, समाजात तीन स्तर असून पहिला स्तर वर्षानुवर्षे धर्मसत्तेचा उपभोग घेताना दिसतो. दुसरा स्तर जल-जमीन-जंगल यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या धनसंपत्तीचा उपभोक्ता आहे. तिसऱ्या स्तरातील गटात बहुतांश समाज असून या स्तरातील लोकांकडे उपभोगाची कोणतीही साधने नाहीत. त्यामुळे हा वर्ग शिक्षणाकडे वळला असून शिक्षणामार्फत नोकरीत समाविष्ट होत आहे. नोकरी करणाला नेहमी पराभूत व्हावे लागते, हे गोविंद काळे यांनी त्यांच्या हिडन मेजरमेंट या कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शासकीय कामात हिडन मेजरमेंटच्या माध्यमातून होत असलेला भ्रष्टाचार गोविंद काळे यांनी सूचकपणे मांडला आहे. सुरुवातीला स्वागत व प्रास्ताविक कवी मारुती कटकधोंड यांनी केले.

दत्ता सुरवसे यांनी मनोगतातून कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. यावेळी रजनीश जोशी यांनी कादंबरीतून अनेक रूपके व उदाहरणे दिल्यामुळे कादंबरी वाचनीय झाल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी या कादंबरीचा ग्रामीण बाज असून अनेक दंतकथा, म्हणी, वाक्प्रचार, लक्ष्यवेधी संवाद यांमुळे कादंबरी वाचकांना खिळवून ठेवते, असे सांगितले. सूत्रसंचालन आकाशवाणीचे निवेदक अभिराम सराफ यांनी केले. आभार प्रदर्शन नरेंद्र काळे यांनी केले.

कार्यक्रमास माजी महापौर श्रीकांचना यन्नम, पद्माकर कुलकर्णी, राजेंद्र भोसले, डॉ. नरेंद्र काटीकर, वंदना कुलकर्णी, बदिऊजम्मा बिराजदार, मुबारक शेख, डॉ. अर्जून व्हटकर, फैय्याज शेख, गिरीश दुनाखे, हेमकिरण पत्की, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. राजेंद्र शेंडगे, डॉ. मीरा शेंडगे, रेखा गायकवाड आदी उपस्थित होते.

# आ. देशमुख यांच्या हस्ते आज वडकबाळ येथे ब्रिज कम बॅरेज बांधण्याच्या कामाचा शुभारंभ

### २९९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार

सुराज्य/सोलापूर

वडकबाळ (ता.द.सोलापूर) येथे ब्रीज कम बॅरेज बांधण्याच्या कामाचा शुभारंभ मंगळवार दिनांक २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता काटव्वा देवी मंदिर येथे आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. या बंधाऱ्यामुळे वडकबाळ येथील ७५ हेक्टर क्षेत्र, वांगी येथील ८५ हे. क्षेत्र तर हत्तुर येथील ९० हे. क्षेत्र, समशापूर येथील ४९ हे. क्षेत्र मिळून एकूण २९९ हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे जवळच असणाऱ्या वडकबाळचा चेहरामोहरा बदलणार आहे.



येथील ब्रीज कम बॅरेज बंधारा बांधण्याचे काम बऱ्याच दिवसापासून प्रलंबित होते. आमादार सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नाने हे काम हाती घेण्यात आलेले आहे. विजापूर-पुणे रस्त्यावर वडकबाळ येथील ब्रीजच्या वरील भागात ब्रीज कम बंधारा बांधण्याचे काम प्रस्तावित आहे.या कामास सर्वसाधारण ५.८२ कोटी खर्च अपेक्षित आहे. बॅरेजची लांबी १८० मीटर असुन उंची ३.५० मीटर आहे. जोथा पातळी १.५० मीटर उंचींवर आहे. त्यामुळे या बंधाऱ्यात सतत पाणी साठून राहणार आहे. या बंधाऱ्यास १ मी. ु १ मी. आकाराचे १० दरवाजे आहेत. दरवाज्यांची उघडझाप बंधाऱ्याच्या आतून होणार आहे. या बंधाऱ्यात ३५.६० द.ल.घ.फू. पाणीसाठा होणार आहे. पुर्ण संचयने पाणी साठल्यास नंदुर बंधाऱ्यापर्यंत पाणी साठून राहणार आहे. बंधाऱ्यामुळे वडकबाळ येथे पर्यटन स्थळ निर्माण होणार आहे. सातत्याने पाणी साठल्याने मच्छीमार व बोटींग व्यवसाय मोठ्या प्रमाणावर तयार होणार आहे. वडकबाळ येथे कट्टव्वा देवी लक्ष्मी मंदीर येथे घाट बांधण्याचे काम जवळजवळ पुर्ण झालेले आहे.या कामास रू.१.५० कोटी खर्च अपेक्षित आहे. वडकबाळ घाट हा सेल्फी पॉइंट म्हणून चर्चेत आहे.

घाटाच्या शेजारी धबधबा करण्यात येत असून बाजुच्या जमिनींमध्ये बगीच्या फुलविण्यात येत आह. या कार्यक्रमाला वडकबाळ येथील सर्व ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# बाह्य यंत्रणेद्वारे अधिकारी, कर्मचारी भरती प्रक्रियेला अधिकारी-कर्मचाऱ्यांचा विरोध

## भरती प्रक्रिया रोखण्याची आमदार कल्याणशेट्टी यांचेकडे मागणी

सुराज्य/सोलापूर



६ सप्टेंबर २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे १३८ संवर्गातील विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे बाह्यकंत्राटी पद्धतीने भरण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्याची भरती प्रक्रिया सुरू झालेली आहे. या भरती प्रक्रियेस महाराष्ट्रातील सर्व अधिकारी कर्मचारी संघटनेचा विरोध केला आहे. ही भरती प्रक्रिया रद्द करण्याची मागणी आज आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे जिल्हा परिषद कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी यांनी केली.

६ सप्टेंबर २०२३ च्या शासनाची होळी केल्याची बाब आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या निदर्शनास आणून दिली.सोलापूर जिल्हा परिषद येथे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची भेट घेऊन कर्मचारी युनियनच्या वतीने हा शासन निर्णय प्रशासकीय यंत्रणेसाठी समाजासाठी व राज्यासाठी. कसा घातक आहे हे दाखवून दिले. या शासन निर्णयामुळे प्रशासकीय यंत्रणेत, समाज व्यवस्था व तरुणांमध्ये शासनाविषयी असंतोष निर्माण झाला आहे. ही बाब आपण मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावी, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या. ही बाब निश्चितपणे शासनाच्या निदर्शनास आणून देऊ असे आश्वासन आ. कल्याणशेट्टी यांनी दिले .

राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज यांनी याबाबतीत निवेदन दिले. यावेळी कार्याध्यक्ष सचिन जाधव, डॉ. एस.पी माने, जहीर शेख, संतोष जाधव, रणजित गव्हाणे, भीमाशंकर वाले, गणेश कस्तुरे, सादिक शेख आदी उपस्थित होते.

# शेतीला पूरक व्यवसाय करा : आ. देशमुख

## अंत्रोळी येथे सोलापूर सोशल फाउंडेशनच्या वतीने कार्यशाळा

सुराज्य/सोलापूर

केंद्र सरकारने अनेक नागरी हितांच्या योजना आणल्या आहेत. त्या सर्व योजना प्रत्येक गावात राबवण्यात येणार आहे. आता सर्वांनी शेतीला पूरक असा व्यवसाय करावा, त्यासाठी कोणत्याही प्रकारची मदत लागली असेल आपण ती करण्यास कटिबद्ध आहोत. प्रत्येक गाव हरित करणे हा आपला संकल्प आहे, असे प्रतिपादन माजी सहकार मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

सोलापूर सोशल फाउंडेशन आणि जिव्हाळा शेती कर्मचारी च्या वतीने अंत्रोळी (ता. द. सोलापूर) येथे रविवारी आयोजित समृद्धी कार्यशाळेत आमदार सुभाष देशमुख बोलत होते. या कार्यशाळेला टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे संचालक डॉक्टर रमेश जारे, समृद्ध गाव अभियान जिल्हा समिती प्रमुख मोहनराव अनपट, कृषीतज्ञ मनोज शहा आदींची उपस्थिती होती.

आ. देशमुख पुढे म्हणाले, केंद्र सरकारने कृषी क्षेत्रात यंदाच्या भरड धान्य वर्षांचं औचित्य साधून त्यांच्या लागवड, साठवण आणि वितरण विक्री साठी सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा. प्रत्येक गावात शाळा आणि वैद्यकीय सुविधा पुरवण्यावर आपला भर राहणार आहे. सर्वांनी आता शेतीव्यतिरिक्त त्याला पूरक असा व्यवसाय सुरू करावा त्यासाठी आपण सर्वतोपरी मदत करू, असे आश्वासनही आमदार देशमुख यांनी दिले. लोकसहभागातून ग्राम विकास कसा करावा, हे माझ्या चिंचणी गावातील लोकांकडून शिकावे. आमचे गाव समृद्ध आहे, पर्यटन आहे. गावातील लोकांना गावातच रोजगार उपलब्ध आह. हे सर्व आ. देशमुख यांच्या प्रयत्नामुळे झाले आहे, असे मोहन अनपट यांनी सांगितले. कृषितज्ञ मनोज शहा म्हणाले, आपण गावांसाठी आगोदर काहीतरी देणे लागतो याचा विचार सर्वांनी करावा. सेंद्रिय शेती आपण उदयास आणली पाहिजे .प्रकिया उद्योग प्रत्येक गावात उभा केला पाहिजे. शेतीशिवाय ग्रामविकास शक्यच नाही.

प्रस्तावनेमध्ये रमेश झारे यांनी ग्रामपंचायती योजनेच्या पाढा वाचत त्यातून गावाचा विकास करून घ्यावा, असे आवाहन केले. प्रास्ताविक जिव्हाळा शाळेचे विश्वस्त डॉ. विलास बालगावकर यांनी केले तर आभार अतुल गायकवाड यांनी मानले. यावेळी अंत्रोळी सरपंच माया सलगरे, नानासाहेब झांबरे, रामाप्पा चिवडशेट्टी, हणमंत कुलकर्णी, डॉ. चनगोंडा हवीनाळे, मळसिद्ध मुगळे, सोलापूर सोशल फाउंडेशन चे मुख्य समन्वयक विजय पाटील उपस्थित होते.



सोलापूर : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यशाळेची सुरुवात करताना आमदार सुभाष देशमुख. यावेळी मोहन अनपट, मनोज शहा आदी.



## विरवडे बु. येथील मराठा बांधवांचे उपोषण

विरवडे बु : मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून ५० टक्के च्या आत सरसकट आरक्षण मिळावे या मागणीसाठी विरवडे बुद्रुक ता मोहोळ येथील मराठा बांधव दोन दिवसीय उपोषणासाठी बसले आहेत. अंतरवाली सराटी या गावात मराठा आंदोलकांवर केलेला लाठीचार्ज निषेधार्थ तसेच श्री. मनोज दादा जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने उपोषण सुरू आहे. राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाचा विषय पेटला आहे शासनाने सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे यासाठी दोन दिवसीय उपोषण शासनाने हा निर्णय लवकरात लवकर घ्यावा अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला. या उपोषणामध्ये श्रीधर घन:शाम पाटील ,किरण अवताडे, अरुण गव्हाणे ,संतोष अवताडे , बालाजी गव्हाणे, अनिकेत कोकाटे ,ओम चटके, प्रमोद भालचंद्र आवताडे, भागवत इंगळे व ग्रामस्थ सहभागी झाले आहेत.



## मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त खाऊ वाटप

सांगोला : जशने ईद-ए-मिलादुन्नबी मोहम्मद पैगंबर जयंती निमित्त तांबोळी जमात सांगोला वऑल इंडिया मुस्लिम बॅकवर्ड क्लासेस ऑर्गनायझेशन यांचे वतीने जय भवानी चौक येथे जुलूस मधील समाज बांधवांना व लहान मुलांना खाऊ वाटप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जुलूस चे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी आमदार शहाजी बापू पाटील व माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांनी समाज बांधवांना ईद च्या शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी ज्येष्ठ नेते बाबुरावजी गायकवाड, भाजपाचे जिल्हा अध्यक्ष चेतनसिंह केदार, पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी, तानाजी काका पाटील, मा नगराध्यक्ष अनिल खडतरे, उद्योगपती बाळासाहेब एरंडे, माजी नगरसेवक सुरज बनसोडे, बापूसाहेब ठोकळे, बाळासाहेब बनसोडे, माजी नगरसेवक सतीश सावंत, माजी नगरसेवक माऊली तेली, माजी नगराध्यक्ष चंदन होनराव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



## कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय परिसराची स्वच्छता

पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयातील स्वच्छतेसाठी एक तास हा उपक्रम राबवण्यात आला. विद्यार्थ्यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या स्वच्छता हीच सेवा या अभियानांतर्गत विद्यालयाच्या परिसराची स्वचछता केली यामध्ये शिक्षक अतुल पाटील, जाधव, झाडे, इंगळे, पाटील, ढोले तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## प्रणिता कांबळे यांना फुले समाजभूषण पुरस्कार

उत्तर सोलापूर : मराठी साहित्य मंडळ संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील दैदिप्यमान कामगिरी करणाऱ्या सोलापूर बार्टीच्या प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे ह्यांना जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा नागपूर येथे ठिकाणी ३० सप्टेंबर २०२३ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.प्रणिता कांबळे यांनी आतापर्यंत विविध क्षेत्रात आपल्या कामगिरीने समाजात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.आतापर्यंत ६ राज्यस्तरीय पुरस्कार त्यांना मिळाले असून सोलापूरकरांना ही गोष्ट अभिमानास्पद आहे.



## मोहोळ येथे चाकूने मारहाण

सोलापूर : पैशाच्या व्यवहारातून चाकू आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत रफीक नासिर पठाण (वय ३९ रा.दत्तनगर मोहोळ) हे गंभीर जखमी झाले. ही घटना काल शनिवारी रात्रीच्या सुमारास मोहोळ येथील पान दुकानासमोर घडली. या प्रकरणात मोहोळच्या पोलिसांनी हुसेन नासिर पठाण (रा.मोहोळ) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला. रफीक पठाण हे पान दुकानासमोर थांबले होते. त्यावेळी आरोपी हुसेन पठाण याने तू सिकंदर याच्याकडून पैसे का घेतले ? असे म्हणत त्यांना चाकूने गळ्यावर मारहाण केली. ते खाली कोसळल्यानंतर पुन्हा चाकू आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार उपासे करीत आहेत.

# सांगोला बसस्थानकात स्वच्छता अभियान

सुराज्य/सांगोला

आपुलकी प्रतिष्ठान, जेसीबी असोसिएशन सांगोला व सांगोला बस आगाराचे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने सांगोला एस. टी. डेपो व बसस्थानक येथे स्वच्छता अभियान पार पडले.

म. गांधी जयंती निमित्त आयोजित या स्वच्छता अभियानाचा शुभारंभ सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष तथा आपुलकीचे सदस्य चेतनसिंह केदार -सावंत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सर्व जेसीबी चालकांचा सन्मान करण्यात आला. या अभियानासाठी सतीश पाटील, नाना गायकवाड, दत्ता इंगोले, राजू चोरमुले, शंकर लिंगे, रमेश जाधव, सतीश सावंत, धर्मराज केदार यांनी स्वखर्चाने जेसीबी देऊन तर सतीश इंगोले व अरविंद केदार यांनी टिपर, पांडुरंग गायकवाड यांनी ट्रॅक्टर देऊन या उपक्रमासाठी असे सहकार्य केले. यावेळी अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, अरविंद केदार, रमेशअण्णा देशपांडे, अण्णासाहेब मदने, सुधाकर लिगाडे, सतिश राऊत, डॉ. अनिल कांबळे, वसंत सुपेकर, दादा खडतरे, प्रकाश महाजन, प्रथमेश यादव, निसार अहमद इब्राहिम नदाफ, सहायक कार्यशाळा अधीक्षक पृथ्वीराज पारसे, सागर कदम उपस्थित होते.



## रब्बीसाठी पन्नास टक्के अनुदानावर बियाणे

पिलीव : माळशिरस तालुक्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील गहु, ज्वारी, हरभरा बियाणे पन्नास टक्के अनुदानावर उपलब्ध करण्यात आली आहेत. पीक प्रात्यक्षिकासाठी अर्ज करण्याची सुविधा महाडिबीटी पोर्टलवर उपलब्ध करुन दिल्याचे माळशिरस तालुका कृषी अधिकारी पुनम चव्हाण यांनी सांगितले. यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login या वेबसाईटवर जाऊन अर्ज करणयाचे आवाहन त्यांनी केले आहे.

# शिक्षक महासंघाचे गुणवंत पुरस्कार जाहीर

सुराज्य/सोलापूर

शिक्षक महासंघाचे जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक, कर्मचारी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुणवंत पत्रकार पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुरस्कार वितरण सोहळा सोमवार दि. २ रोजी सकाळी ११ वाजता शिवस्मारक येथे होणार आहे. या सोहळ्यास महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाचे जिल्हास्तरीय गुणवंत पत्रकार, गुणवंत शिक्षक आणि गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहवे अशी घोषणा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष आण्णासाहेब भालशंकर यांनी केली आहे. यामध्ये यामध्ये दैनिक सुराज्यचे संजय आठवल, दै पुढारी चे अमोल साळुंखे, यांचाही सन्मान होणार आहे. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षका पुरस्काराने प्रज्ञा वाघमारे, शोभा मारकड, क्रांतीसुर्य जोतीराव फुले गुणवंत शिक्षक पुरस्काराने नागनाथ विद्यालयाचे प्राचार्य बशीर बागवान, मनोहर इंगोले, नितीन गायकवाड, शिवाजी जगताप, रतन शिवशरण, युवराज जाधव, बसवराज गायकवाड यांचा सन्मान होणार असून राजर्षी शाहू महाराज गुणवंत कर्मचारी पुरस्काराने डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रशालेचे लिपिक किसन कांबळे, साने गुरुजी विद्यामंदिरचे सोमनाथ साळुंखे, शरदचंद्र पवार माध्यमिक विद्यालय येथील प्रयोगशाळा परिचर नानासाहेब भालशंकर, संजय गडदे यांचा देखील पुरस्काराने गौरव होणार आहे.

# जिल्हा न्यायाधीश पांढरे यांची अन्नछत्र मंडळाला भेट

सुराज्य/अक्कलकोट

सोलापूर जिल्हा न्यायाधीश रेखा पांढरे-जोशी यांनी श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाला भेट दिली.

न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळात महाप्रसाद सेवा ही उल्लेखनीय आहे, याबरोबरच परिसरातील स्वच्छता, वसुंधरेची जपणूक होत असल्याचे त्यांनी सांगितले. न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते रेखा पांढरे यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या समवेत नागपूर, बीड व अकोलाचे जिल्हा न्यायाधीश शयना पाटील, एस.एस.नगुर, सुरेखा पाटील हे उपस्थित होते. यावेळी ॲड.संतोष खोबरे, सिद्धेश्वर मोरे, स्वप्नील मोरे व मंडळाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, सिद्धाराम कल्याणी, एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, बाळासाहेब पोळ, दत्ता माने, देवराज हंजगे आदी उपस्थित होते.



# पुणे- सोलापूर महामार्गावर टोमॅटो फेकून आंदोलन

मोडनिंब : टोमॅटोच्या कोसळलेल्या दरामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्याने पुणे-सोलापूर महामार्गावर टोमॅटो फेकून आंदोलन केले. शेटफळ येथे माढा रस्त्यालगत झालेल्या या आंदोलनाने सुमारे अर्धा तास महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली.



उत्पादित झालेल्या टोमॅटोस कवडी मोलाचा दर मिळत आहे. उत्पादनावर होणारा खर्चही भागत नाही. अशातच शेटफळ येथील हनुमंत जाधव या शेतकऱ्याचा जवळपास पाच टन टोमॅटो व्यापाऱ्यांनी ४० पैसे प्रतिकिलो दराने मागितले. टोमॅटो तोडणी, वाहतूक व हमालीचा खर्च जवळपास प्रतिकिलो दीड रुपया होतो. शिवाय लागवडीपासून आजपर्यंत झालेला लाखो रुपयांचा खर्च वेगळाच. अशातच २५ किलोच्या टोमॅटोच्या कॅरेटला दहा रुपये दराने व्यापाऱ्यांनी मागितल्यामुळे संतप्त झालेल्या या शेतकऱ्याने सर्व टोमॅटो महामार्गावर फेकून दिले. संतप्त शेतकऱ्याच्या या आंदोलनास शेतकऱ्यांनी पाठिंबा दिला.

# चिक्करेवणसिद्ध शिवशरण महास्वामीजी यांना श्रध्दांजली

सुराज्य/अक्कलकोट

शहर कोष्टी समाजाच्यावतीने गुरुवारी वागदरी रोडवरील शरण मठ येथे श्री श्री श्री चिक्करेवणसिद्ध शिवशरण महास्वामीजी यांना श्रध्दांजली वाहिली. याप्रसंगी शहर अध्यक्ष शिवशंकर बाबा, महिला अध्यक्षा सुनंदा अष्टगी, अनिल करजगी, पप्पू आळंद, शहर महिला अध्यक्षा महादेवी नंदर्गी, मल्लू कवंची, राजु दुधगी आदींनी शोकसभेत श्रध्दांजली वाहिली.

शिवशरण महास्वामीजी यांचे लिंगैक्य झाल्याची वार्ता पसरताच देशाच्या विविध भागातून धर्मगुरू, आमदार ,राजकीय नेत्यांसह मोठ्या संख्येने भाविक गुडदनाळ गावात दाखल झाले आणी दर्शन घेतले. मंगळवार रात्री प्रवचन व भजनाचा कार्यक्रम पार पाडला. २९ रोजी सकाळी ८ वा. गुडदनाळ गावात सर्व भक्तगण व भाविकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

हंपीचे पूज्य श्री दयानंदपुरी महास्वामीजी, गुळेदगुड येथील पूज्य श्री बसवराज पट्टदार्य महास्वामीजी, हुबळीचे श्री शिवशंकर महास्वामीजी,इंचालचे श्री शिवानंद भारती महास्वामीजी,बिदरचे श्री शिवकुमार महास्वामीजी, श्री गणेशानंद स्वामीजी, श्री पानवानंद स्वामीजी मुचलंबा, निजगुणी देव हुणशाळ, असे दोनशेहून अधिक पूज्य व अककलकोट नरेश श्रीमंत मालोजीराजे भोसले उपस्थित होते. अक्कलकोट, वागदरी, मैंदर्गी, वळसंग, गुलेदगुड्ड, बागलकोट, गुलळेदगुड्डा. मदनहिप्पारा, तोळणूर,हिरोळी, विजयपूर, दुधनी अशा अनेक ठिकाणाहून भाविक आले होते.



# कुर्डूवाडीत श्री सदस्यांचा स्वच्छता मोहिमेत सहभाग

सुराज्य/कुर्डूवाडी

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत व स्वच्छता पंधरावडा निमित्त चला करुवा स्वच्छतेसाठी श्रमदान या अभियान अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त १ ऑक्टोंबर रोजी कुर्डूवाडी नगरपालिका व डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमानाने शहरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यावेळी एक हजार श्री सेवकांनी शहरातील स्वच्छता केली.


शहरातील गांधी चौक येथे नगरपरिषदेचे ब्रॅन्ड अम्बेसिटर डॉ. विलास मेहता यांच्या हस्ते अभियानाचे उद्‌घाटन करण्यात आले. साहित्याची पूजन सफाई कर्मचारी बापू खिलारे यांच्या हस्ते करण्यात आले.या मोहिमेत कुर्डु, लऊळ, केवड व कुर्डूवाडी मधील ५४७ श्री सदस्य व शहरामधील व्यापारी, नागरिक, पत्रकार, डॉक्टर, अभियंता, वकील तसेच विविध प्रशालेतील विद्यार्थी व शिक्षक यांनी सक्रिय सहभाग नोंदवला होता.



अभियान यशस्वी करण्यासाठी प्रभारी कार्यालयीन अधीक्षक रविंद्र भांबुरे, दत्तात्रय गायकवाड स्वच्छता निरिक्षक, सदस्य बाळासाहेब भिसे,गोरख सातव, देविदास कदम, शीकांत राजहंस, कोमल बावरे, रोहिदास सोनवणे, अतुल शिंदे, चंद्रकांत मदने रविकांत मदने, राम ताकभाते, सुनिल कोळी, राजेश कदम, कुमार कोळी, दादा टेंगल, नितीन आखाडे, पांडुरंग भानवसे, सुरेश कदम, शिवाजी खवळे, राजु चोपडे, महादेव खवळे, रविंद्र कांबळे, विनोद खिलारे, सुदर्शन साठे, विशाल खिलारे, बंडू जाधव, गणेश बंडगे, महादेव कांबळे, परमेश्वर कसबे, आरती वाल्मीकी. परमेश्वर कसबे, विशाल कसबे, खंडू खवळे सुवर्णा मागाडे, उमा शिंदे, आरती वाल्मीकी, बायणाबाई गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. शहराची स्वच्छता व साफसफाई करण्यात आली. शहरामधील कचरा व गटारी मधील गाळ १.५ ते २.५ टन गोळा करण्यात आला आहे.

# बार्शी येथे दिवसा घरफोडी; दोन लाखाचे दागिने गायब

सांगोला : दिवसा बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील रोख रकमेसह २ लाख १४ हजार रुपयांचे दागिने पळविले. ही चोरी बार्शी येथील जनार्दन नगरात काल शनिवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.




या संदर्भात अजय उत्तम सावंत (रा. जनार्दन नगर,बार्शी) यांनी बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. ते काल सकाळी ११ वाजता घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. दुपारी २ वाजता परतल्यानंतर त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आज प्रवेश केला . आणि कपाटातील २० हजार रुपय रोख आणि ५२ ग्रॅम सोन्याचे दागिने घेऊन पसार झाला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे . पुढील तपास फौजदार गळगटे करीत आहेत.

# राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत लक्ष्मण माळी प्रथम



**सोलापूर** : निर्मिती फिल्म क्लब कोल्हापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या 'सर्वव्यापी शाहू महाराज' यांच्या जीवन कार्य आणि विचारांवर आधारित भव्य राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत कळमण( ता.उ.सोलापूर) येथील सहशिक्षक लक्ष्मण माळी यांचा प्रथम क्रमांक आलाफ या नावाजलेल्या निबंध स्पर्धेमध्ये पाचशेहून अधिक निबंध स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.लोकराजे छत्रपती शाहू महाराज यांचा ज्वलंत, वास्तववादी व सामाजिक क्रांतीचा इतिहास समजून घेण्यासाठी आणि महामानवांच्या विचारांचा जागर करण्यासाठी महाराष्ट्र व मराठी भाषेतील सर्वात मोठ्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वव्यापी छत्रपती शाहू महाराज या निबंध स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस दोन लाखांचे असून त्यामध्ये पंचवीस हजार रोख आणि एक लाख पंच्याहत्तर हजारांची पुस्तके असे आहे. २ ऑक्टोबर २०२३ रोजी कोल्हापूर येथे होणाऱ्या एका शानदार सोहळ्यात लक्ष्मण माळी यांचा गौरव करण्यात येणार आहे.

त्यांच्या या यशाबद्दल कळमण गावचे सरपंच श्री पांडुरंग लंबे, उपसरपंच सुनील पाटील,सर्व ग्रामपंचायत सदस्य, मित्रमंडळी, आणि गावकऱ्यांनी अभिनंदन केले.

## महत्त्वाचे वृत्त...

### भारतात एका वर्षात रेबीजने ३०७ जणांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर** : गेल्या वर्षी तब्बल ३०७ नोंदणी झालेल्या व्यक्तींचा रेबीजमुळे देशात मृत्यू झाला आणि एक कोटी ७० लाख श्वानदंशाच्या रुग्णांची नोंदणी झाली. पैकी २९ व्यक्तींचा महाराष्ट्रात मृत्यू झाला आहे. प्रत्यक्षातील आकडे आणखी कितीतरी जास्त असू शकतात, अशीही शक्यता व्यक्त केली जाते. पुन्हा एकीकडे मोकाट कुत्र्यांवर नसबंदीच्या कारवाईचे प्रमाण अत्यल्प असताना, दुसरीकडे सरकारी रुग्णालयांमध्ये श्वानदंशावरील इंजेक्शनचा अनेकदा तुटवडा असल्याचे चित्र असते. त्यामुळे दोन्ही पातळ्यांवर प्रभावी काम झाल्याशिवाय आणि शक्य असलेल्यांनी सरकारवर अवबंलून न राहता स्वखर्चाने उपचार घेतल्याशिवाय प्रमाण कमी होण्याची शक्यता नाही, याकडे तज्ज्ञांनी (२८ सप्टेंबर) पाळण्यात येणाऱ्या जागतिक रेबीज दिनानिमित्त लक्ष वेधले आहे.

### राज्यात बोगस जातप्रमाणपत्रांची विक्री : वडेट्टीवार

**नागपूर** : राज्यात बोगस जातप्रमाणपत्र विक्री होत असल्याचा गंभीर आरोप करून, या प्रकाराचा एसआयटीमार्फत तपास करावा, अशी मागणी विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी येथे केली. राज्यात २८ लाख मराठ्यांना ओबीसी प्रमाणपत्र विकले गेले. प्रमाणपत्राचा भाव ५ हजार ते एक लाख रुपयांपर्यंत आहे. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे मराठा आहेत. त्यांनीही ओबीसींचे प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळवलेले आहे', असा दावाही वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी बोलताना केला.

### खरंच तिचं काय चुकलं? नवी मालिका भेटीस

**मुंबई** : गूढ, शांत आभा निवास आणि एका असहाय आईसोबत दोन लहान मुलींचा आर्त आक्रोश मांडणारी अनोखी कथा म्हणजेच 'खरंच तिचं काय चुकलं?' उत्कंठा ताणून धरणारा सोनी मराठीवरील एक प्रोमो सध्या सगळ्यांचेच लक्ष वेधून घेतो आहे. ३ ऑक्टोबरपासून सोमवार ते शुक्रवार रात्री ९.३० वा. आपल्याला सोनी मराठीवर पाहता येणार आहे. आभा आणि कुहू दोन सख्ख्या बहिणी, पण स्वभाव मात्र टोकाचे. एक मनमिळाऊ तर दुसरी आत्मकेंद्री. एक समजूतदार तर दुसरी अविचारी. आभाला स्वकष्टाचं मोल तर कुहूला झटपट श्रीमंतीची ओढ. दोघींचा प्रवास सुखकर आयुष्याचाच पण एकीचा सरळमार्गी तर दुसरीला आपले ईप्सित साध्य करण्यासाठी वाट वाळवावी लागली तरी बेहत्तर. या दोघीही नकळत आपल्या भूतकाळाशी बांधल्या गेल्या आहेत.

### ठाकरेंनी वाघनखांवरून घेरले, भाजपा तुटून पडली

**छत्रपती संभाजीनगर** : लंडनच्या संग्रहालयातील छत्रपती शिवरायांची वाघनखं पुढच्या तीन वर्षांसाठी राज्य शासन भारतात आणत आहे. परंतु या वाघनखांवरून सध्या जोरदार आरोपप्रत्यारोप सुरू आहेत. ती शिवरायांची वाघ नसल्याचं इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी म्हटलंय. तर त्यांचीच री ओढत विरोधकांनी देखील सरकारला यावरून धारेवर धरलंय. वाघनखं खरी असतील तर पुरावे द्या नाहीतर शिवभक्तांच्या भावनांशी खेळू नका, असं आव्हानच शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी सरकारला दिलंय. यावरून भाजप नेत्यांनी शनिवारी आदित्य ठाकरे यांना जोरदार समाचार घेतला.

### खत घेण्यास शेतकऱ्यांची चक्क चपलांची रांग

**गुजरात** : गुजरातमध्ये शेतकऱ्यांना खत खरेदी करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतोय. तासन्तास भल्यामोठ्या रांगेत उभे राहूनही आपला नंबर येत नसल्याने शेतकऱ्यांनी नामी शक्कल लढवली आहे. खत घेण्यासाठी रांगेत उभे राहून वैतागलेल्या शेतकऱ्यांनी स्वत: रांगेत उभे राहण्याऐवजी चक्क चप्पल-बुटांचे जोड ठेवले आहेत. या प्रकाराचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. त्यानंतर शेतकरी नेते राकेश टिकैत यांनीही बूट आणि चपलांच्या रांगेचा व्हिडिओ शेअर करून गुजरात मॉडेलवर सडकून टीका केली आहे.

### सणासुदीच्या तोंडावर महागाईचा भडका

**नवी दिल्ली** : महागाईच्या दणक्याने ऑक्टोबर महिन्याची सुरुवात झाली आहे. कारण महिन्याच्या सुरुवातीलाच एलपीजी सिलिंडरच्या किमती वाढवण्यात आल्या आहेत. ऑईल मार्केटिंग कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमतीत मोठी वाढ केली असून त्याअंतर्गत १९ किलो वजनाचा एलपीजी गॅस सिलिंडर २०९ रुपयांनी महागला आहे. ऑक्टोबर महिन्यात नवरात्रोत्सव आणि दसऱ्यासारखे सण आहेत. अशातच तेलाच्या किमती वाढवल्याने याचा सामान्य नागरिकांवर मोठा परिणाम होणार आहे. दरम्यान, २०९ रुपयांच्या वाढीनंतर नवी दिल्लीत १९ किलोच्या एलपीजी गॅस सिलिंडरची किंमत १,७३१.५० रुपये इतकी होणार आहे.

### भारतातील दूतावास अफगाणने बंद केला

**नवी दिल्ली** : भारताचा शेजारी देश असलेल्या अफगाणिस्तानने आजपासून भारतातील त्यांचा दूतावास बंद करण्याची घोषणा केली आहे. इथल्या सरकारकडून आणि मुत्सद्द्यांकडून अपेक्षित मदत मिळत नसल्याने हा निर्णय घेतला असल्याचं अफगाणिस्तानच्या दूतावासाने स्पष्ट केलं आहे. इस्लामिक रिपब्लिकन ऑफ अफगाणिस्तानच्या दूतावासाने रविवार, १ ऑक्टोबर २०२३ पासून भारतातील कामकाज बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचं अधिकृत निवेदनाद्वारे जाहीर केलं आहे. या निवेदनात दूतावासाने म्हटलं आहे की नवी दिल्लीतल्या अफगाणिस्तानच्या दूतावासाने आजपासून भारतातलं आमचं कामकाज बंद करण्याचा निर्णय जाहीर करताना आम्हाला खूप निराशा, दुःख आणि खेद वाटतोय.



# शाळा वाचवा-शिक्षण वाचवा; हजारो शिक्षक रस्त्यावर उतरले

**सुराज्य/कोल्हापूर**

शाळा वाचवा-शिक्षण वाचवा, खाजगीकरण रद्द झाले पाहिजे, कंत्राटीकरण रद्द झाले पाहिजे. शिक्षण आमच्या हक्काचे-नाही कुणाच्या बापाचे अशा घोषणा देत कोल्हापुरात हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी शनिवारी रस्त्यावर उतरले. कोल्हापूर जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चाने शाळांचे खाजगीकरण आणि नोकर भरती कंत्राटीकरणाच्या विरोधातील आवाज बुलंद केला.

सरकारने आपल्या निर्णयात बदल केला नाही तर आंदोलनाचा टप्पा वाढविण्यात येईल, असा इशाराही त्यांनी मोर्चाद्वारे दिला. राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा कार्पोरेट कंपन्यांना शाळा दत्तक योजना या तत्त्वावर देण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय मोठ्या देणगीदारांची नावे शाळेला देण्यात येणार आहेत. सरकारी नोकर भरती कंत्राटी पद्धतीने करण्याचाही निर्णय घेतला आहे. या विरोधात कोल्हापुरात विविध शिक्षक संघटना, पालक संघटना, कर्मचारी आणि नागरिकांनी एकत्रितपणे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली.

## शिर्डीतील धक्कादायक प्रकार

# साई भक्तांना बोगस पावत्या देऊन पैशांचा गैरव्यवहार

**सुराज्य/शिर्डी**

**देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या साईबाबांच्या शिर्डीत दररोज हजारो साईभक्त येत असतात. दर्शनासह साईंच्या झोळीत दान ही टाकतात. मात्र, याच दानात अपहार झाल्याचा गुन्हा साईबाबा संस्थांनने दाखल केल्यानतर एकच खळबळ उडाली आहे. साई भक्ताने दिलेल्या देणगीपोटी बनावट पावती देऊन देणगीदारासह साईबाबा संस्थानची फसवणूक करणाऱ्या कर्मचाऱ्यावर शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**





काही दिवसांपूर्वी साईबाबा संस्थानला एक निनावी पत्र प्राप्त झाले. या पत्रात देणगी कक्षात कामावर असलेला एक कंत्राटी कर्मचारी देणगीदारांना निम्म्या रकमेची बनावट पावती देत असल्याची तक्रार करण्यात आली होती.

साईबाबा संस्थांनने याबाबत चौकशी केली असता सदर प्रकरणी असा प्रकार झाल्याचा समोर आला. देणगी कक्षात कंत्राटी कामावर असलेल्या दशरथ चासकर या कर्मचाऱ्याने अपहार केल्याचा प्रकार चौकशीत समोर आल्यानंतर साईबाबा संस्थानचे प्रभारी लेखा अधिकारी कैलास खराडे यांच्या फिर्यादीवरून कंत्राटी कर्मचारी दशरथ चासकर याच्या विरोधात शिर्डी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिस निरीक्षक एस. पी. शिरसाठ यांनी दिली.

दरम्यान याप्रकरणी आरोपीला अजून कोणाची साथ असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. याचबरोबर आत्तापर्यंत किती लोकांना अशा पद्धतीने बनावट पावत्या देण्यात आला याचा तपास सुद्धा आता पोलीस करणार आहेत. साईबाबांच्या झोळीत साईभक्त श्रद्धेने दान करतात. त्यामुळे साईभक्त व साईबाबा संस्थानची फसवणूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी आता पुढे येत आहे. आता पोलीस आणि प्रशासन याबाबत आगामी काळात काय कारवाई करतात, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# अविनाश साबळेची सुवर्णमय कामगिरी

## बीडच्या लेकाचा चीनमध्ये डंका

**सुराज्य/हांगझोऊ**



चीनमध्ये सुरु असलेल्या आशियाई स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील बीडच्या सुपुत्रानं सुवर्णमय कामगिरी केली आहे. अविनाश साबळे यांनं आशियाई स्पर्धेत इतिहास रचला आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत त्यानं ३ हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात सुवर्णपदक मिळवलं आहे. अविनाश साबळेच्या या यशानं भारताला आणखी एका सुवर्णपदकावर नाव कोरता आलं आहे.

अविनाश साबळे यानं काही महिन्यांपूर्वी झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये रौप्य पदक मिळवलं होतं. यावेळी आशियाई स्पर्धेत तो सुवर्णपदक मिळवेल अशी आशा सर्व भारतीयांना होती. चीनमध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत त्यानं सुवर्णपदकावर नाव कोरलं आहे.

गेल्या महिन्यात बुडापेस्ट येथे झालेल्या जागतिक चॅम्पियनशिपमध्ये तीन हजार मीटर स्टीपलचेसमध्ये अविनाश हा ७ व्या क्रमांकावर राहिला होता. त्यामुळं त्या कामगिरीवर अविनाश साबळे देखील स्वत: खुश नव्हता. मात्र, अविनाश साबळे यानं आशियाई क्रीडा स्पर्धेत नव्या उमेदीन सहभाग घेतला आणि आज सुवर्णपदाकवर नाव कोरलं आहे.

# लंडनमधली वाघनखे शिवछत्रपतींची नाहीत

**दिशाभूल करू नये, सरकारने पुरावे द्यावेत : इतिहास संशोधक इंद्रजित सावंत**

**सुराज्य/कोल्हापूर**

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढण्यासाठी वापरलेली वाघनखं ही लंडनच्या व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझियममध्ये असल्याचा सरकारचा दावा आहे. ती वाघनखे राज्य सरकारला पुढील तीन वर्षांसाठी दिली जाणार आहेत. नोव्हेंबरमध्ये ही वाघनखे मुंबईत आणली जाणार असून तेथून सातारा, नागपूर आणि कोल्हापूर येथे या नखांचं प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. मात्र यावरून आता आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत.


ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी ही शिवरायांची खरी होती का? असे सवाल उपस्थित केले आहेत. त्यानंतर आता कोल्हापुरातील इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी देखील उपस्थित करत ही वाघनखे शिवछत्रपतींनी वापरलेली नसून सरकारने जनतेची दिशाभूल करू नये असे म्हटले आहे.



# पावसाची बॅटिंग; पुणेकरांची चिंता मिटली

**सुराज्य/पुणे**

ऐन पावसाळ्यात गेल्या जून ते सप्टेंबर दरम्यान काही आठवडेच झालेल्या पावसाने खडकवासला धरण साखळी प्रकल्पांमध्ये आतापर्यंत सुमारे ३३ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी जमा झाले आहे. त्यापैकी पाच टीएमसी पाणी आतापर्यंत धरणातून कालव्यात सोडण्यात आले असून प्रकल्पातील धरणांमध्ये शनिवारी सायंकाळपर्यंत २८.३८ टीएमसी पाणी जमा झाले आहे. टेमघर वगळता खडकवासला, वरसगाव आणि पानशेत धरणे फुल्ल झाली आहेत.



जून महिन्याच्या शेवटी पावसाने उशिरा सुरुवात केली. खडकवासला प्रकल्पांमध्ये २१ जूनला ३.२३ टीएमसी पाणी साठा होता, तर तीन जुलैला २.६० टीएमसी पाणी शिल्लक होते.

जुलै आणि ऑगस्ट महिन्यात काही दिवसच पावसाने हजेरी लावली. त्यानंतर ओढ दिल्याने चिंता व्यक्त करण्यात येत होती. तर सप्टेंबर महिन्यात सुरुवातीला थोडा पाऊस झाला. गणरायाच्या आगमनाबरोबर पावसाने पुनरागमन केले. तेव्हापासून ते सप्टेंबर अखेरीसपर्यंत पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खडकवासला प्रकल्पातील खडकवासला, पानशेत आणि वरसगाव ही तीन धरणे सप्टेंबरअखेरीस फुल्ल झाली आहेत. या प्रकल्पांत शनिवारी २८.३८ टीएमसी म्हणजेच ९७.३६ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे.

जूनमध्ये अवघ्या दोन ते तीन टीएमसी असलेला पाणीसाठा पुणे शहरासाठी पिण्यासाठी वापरण्यात आला. तर, पावसाळ्याच्या जून ते सप्टेंबर अखेरपर्यंत झालेल्या खडकवासला प्रकल्पांत २८ टीएमसी पाणी धरणात जमा झाले. तर आणखी पाच टीएमसी पाणी हे कालव्यात शेतीसाठी सोडण्यात आल्याने आतापर्यंत ३३ टीएमसी पाणी धरणात जमा झाल्याचे जलसंपदा विभागाने सांगितले.

खडकवासला प्रकल्पाच्या पाण्यासाठ्यात सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे सुमारे तीन टक्क्यांची वाढ झाली आहे. खडकवासला धरण १०० टक्के भरल्याने धरणातून सायंकाळनंतर दोन हजार १४० क्युसेकने विसर्ग करण्यात येत होता. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस झाल्यास धरणे पूर्ण भरतील, अशी आशा जलसंपदा विभागाने व्यक्त केली आहे.

### विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण बुक सादर

**सुराज्य/सोलापूर**

नवनीत एज्युकेशनच्या एचक्यू या प्रीमियम स्टेशनरी ब्रँडतर्फे गांधी जयंतीच्या औचित्याने खास 'खादी' जर्नल सीरिज सादर केली. हे जर्नल खादीच्या ४ सुंदर रंगांमध्ये आणि ए५ आकारात असून या जर्नलमध्ये १९२ पाने आहेत. तसेच हे बुक विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल. अभिजीत सान्याल म्हणतात की, नाविन्यपूर्ण कल्पना राबविल्याने आम्ही इतके सहज आणि तितकेच बहुमोल उत्पादन तयार करू शकलो.



# लांडग्यांची संख्या वाढवण्यासाठी खास प्लॅन

**सुराज्य/पुणे**

समृद्ध माळरानांचे प्रतीक असलेल्या लांडग्यांच्या (वुल्फ) संवर्धनाचे पुणे मॉडेल लवकरच राज्यात राबविण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यात गेल्या काही वर्षांपासून लांडग्यांचा अधिवास, त्यांची वसतिस्थाने, समूह स्तरावरील त्यांचे वर्तन आणि त्यांच्या समस्यांवर शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास सुरू आहे. यातील निष्कर्षांच्या आधारे लांडगा संवर्धनाचा राज्यस्तरीय आराखडा विकसित झाला आहे.

राज्य वन विभागाने 'लांडगा संवर्धनाच्या राज्यस्तरीय आराखड्या' ला मान्यता देऊन केंद्रीय वन्यजीव मंडळाकडे प्रस्ताव पाठवला आहे. मंडळाचे शिक्कामोर्तब झाल्यावर प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू होणार आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील दहा जिल्ह्यांमध्ये प्रकल्प राबविण्याचा ग्रासलँड ट्रस्ट आणि 'अशोका ट्रस्ट फॉर रिसर्च इन इकॉलॉजी अँड एन्व्हायर्न्मेंट' या संस्थांचा प्रस्ताव आहे.

ग्रासलँड ट्रस्ट गेल्या दहा वर्षांपासून माळरान संवर्धन आणि लांडग्यांच्या डॉक्युमेंटेशनचे काम करीत आहे. संस्थेच्या चमूने वन विभाग आणि गावकऱ्यांच्या सहभागातून सासवड, जेजुरी, सुपे, दिवेघाटातील माळराने आणि लांडग्यांचे व्हिडिओ चित्रीकरण, नकाशे, छायाचित्रे आणि वसतिस्थानांचे सखोल डॉक्युमेंटेशन केले आहे. आता कामाचा पुढचा टप्पा म्हणजेच लांडग्यांच्या संवर्धनाचे काम सुरू आहे.

# राज्यावर पाणीटंचाईची टांगती तलवार

**सुराज्य/मुंबई**

पावसाळ्याचे चार महिने संपले असताना, राज्यभरातील ३२ प्रमुख व मोठ्या धरणांच्या जलाशयांमधील साठ्याची स्थिती फारशी समाधानकारक नाही. या प्रमुख जलाशयांमध्ये केवळ ७९ टक्के पाणीसाठा आहे. त्यामध्ये मागील वर्षीपेक्षा तब्बल २० टक्क्यांची तूट आहे. राज्यातील पाच जलाशयांमधील साठा ८० टक्क्यांहून कमी आहे. यामुळे यंदा राज्यावर पाणीटंचाईचे सावट दिसत आहे.

यंदा पावसाळ्यात सर्वत्र पाऊस असमतोल स्वरूपात कोसळला. धरणक्षेत्रातही हा पाऊस असमतोलच पडला. परिणामी, धरणांमधील जलसाठ्यात तूट निर्माण झाल्याचे केंद्रीय जलआयोगाकडील माहितीतून समोर आले आहे. आयोगाकडून देशभरातील प्रमुख १५० धरणांमधील जलसाठ्यांचा अभ्यास केला जातो. त्यानुसार, देशभरातील ही धरणे सध्या सरासरी ७९ टक्के भरली आहेत. ही टक्केवारी मागील वर्षीपेक्षा १० टक्के कमी आहे. तर दहा वर्षांच्या सरासरीपेक्षा त्यात सहा टक्क्यांची तूट आहे. या १५० धरणांमध्ये राज्यातील ३२ धरणांचा समावेश आहे. या ३२ धरणांच्या जलाशयांमधील सरासरी जलसाठा देशाच्या सरासरीहून अधिक असला, तरी आता पावसाळा संपत आल्याने चिंताजनक स्थितीवर आहे.

राज्यातील या धरणांमधील जलाशयांत सध्या १५००.०६५ कोटी घन मीटर इतके पाणी आहे.



मागील वर्षी सप्टेंबरअखेरीस हा साठा १८००.८९ घन मीटर इतका होता. तर दहा वर्षांची सरासरी १६००.३६ घन मीटर इतकी आहे. यानुसार सध्या ही धरणे ७९ टक्के भरली असून, मागीलवर्षी या काळात मात्र ती ९९ टक्के भरलेली होती. दहा वर्षांची सप्टेंबरअखेरची सरासरी ८५ टक्के इतकी आहे.

**११ धरणे ८० टक्क्यांच्या खाली**

जलाशयातील साठा ८० टक्क्यांहून कमी असलेली धरणे चिंताजनक श्रेणीत व ५० टक्क्यांहून कमी साठा असलेली धरणे अतिचिंताजनक श्रेणीत गणली जातात. यानुसार राज्यातील तब्बल नऊ धरणांच्या जलाशयांमधील साठा ८० टक्क्यांच्या खाली व दोन धरणांमधील साठा ५० टक्क्यांहून कमी आहे. ११ धरणांत जायकवाडी, उजनी, इसापूर, येल्दारी, गिरणा, अप्पर तापी, धोम, माणिकडोह, उरमोडी, कान्हेर व बारवी यांचा समावेश आहे.

**उजनी, जायकवाडी अतिचिंताजनक**

भीमा नदीवरील उजनी धरणातून दक्षिण-पूर्व महाराष्ट्राला पाणीपुरवठा होतो. तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गोदावरी नदीवरील जायकवाडी धरण हे संपूर्ण मराठवाड्याला संजीवनी देणारे आहे.

मात्र, या दोन्ही धरणांची स्थिती भीषण आहे. उजनीतील साठा फक्त ३० टक्के, तर जायकवाडीतील साठा फक्त ४० टक्के आहे.

**प्रमुख ३२ धरणांमध्ये ७९ टक्केच पाणीसाठा**

### गोदावरी खोऱ्यात ७५ टक्केच पाणीसाठा

उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्राचा काही भाग व मराठवाडा, या तिन्ही प्रदेशातील नागरिकांसाठी गोदावरी खोरे महत्त्वाचे आहे. या खोऱ्यात सध्या ७४.३७ टक्केच पाणीसाठी आहे. मागील वर्षी सप्टेंबरअखेर या खोऱ्यात ८२.९१ टक्के जलसाठा होता. या खोऱ्यातील दहा वर्षांची सरासरी ७०.७९ टक्के आहे.




# ‘दक्षिण’मध्ये अनेकांचे राजकीय भवितव्य टांगणीला

**विधानसभा निवडणुकीसाठी जवळपास एक वर्षाचा कालावधी असला तरी दक्षिण सोलापूर विधानसभा लढण्यासाठी इच्छुक असलेल्या दिग्गजांकडून मतदारसंघात वेगवेगळे कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून स्वत:ला सिध्द करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे.आगामी निवडणूक ही अनेक अर्थाने गाजणार असल्याने राजकीय नेत्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे.**

रविकांत धनशेट्टी

सध्या दक्षिण सोलापूर विधानसभा निवडणुकीचे वातावरण तापत असून त्यातच भाजपचे विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांना सलग दोन निवडणुकीत विधानसभेत नेतृत्व करण्याची संधी मतदारांनी दिली. मतदारसंघातील रस्त्यांचे काम व मोठ मोठे उद्योगधंदे आणण्यासाठी गेल्या वीस वर्षांत त्यांच्याकडून ठोस प्रयत्न झाले नाहीत. सत्तेची संधी मिळाली तर सोलापुरातील बंद गिरण्या चालू करू, असे विधान त्यांनी काँग्रेसची राजवट असताना केली होती. मात्र, सत्तेत आल्यानंतर त्यांची चाल ’लोकमंगल’ पुरतीच मर्यादित राहिली. तरी देखील आता त्यांनी हॅटट्रिक करण्याची तयारी आपल्या कासवगतीने व्यूहरचना आखत आहेत. कुठल्याही परिस्थितीत २०२४ मध्ये पुन्हा विधानसभेत जाण्यासाठी कासव गतीने वाटचाल चालू केली आहे. अखेर कासवच शेवट गाठणार की,अन्य कोणाला संधी मिळणार,याकडे लक्ष लागले आहे.



माजी आमदार दिलीप माने हे दक्षिण सोलापूर तालुक्यातून विधानसभेसाठी ताकतीने तयारी करत असून कुठल्याही परिस्थितीत या वेळेला माघार घेणार नाही. मागच्या विधानसभा निवडणुकीमध्ये झालेली चूक पुन्हा यावेळी होणार नाही, याची दक्षता घेत असून दिलीप माने हे नाव २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या मतदानयंत्रावर असणार हे निश्चित.पण माने हे कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढविणार, हे विधानसभा निवडणुकीच्या अगोदर तीन महिने पक्ष जाहीर करणार असल्याची माहिती स्वतः त्यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितली आहे. माने यांचे कार्यकर्ते त्या दृष्टीने आतापासूनच कामाला लागलेले आहेत. पुन्हा एकदा ते तालुक्यातील त्यांच्या शिलेदारांसह मोर्चेबांधणी करु लागले आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील त्यांच्या समर्थकांची ते बैठक घेत आहेत. कोठे काय तयारी करावी लागेल, याची ते आपल्या समर्थकांकडून माहिती घेत आहेत. दूर गेलेल्यांशी पुन्हा दोस्ताना करताना दिसत आहेत. उत्तर तालुक्यातील गावांवर त्यांचे एकहाती वचक आहे. त्यामुळे त्यांनी आता फक्त दक्षिण मधील ५६ गावे आणि शहारातील बारा प्रभागावरच लक्ष केंद्रीत केले आहे.





सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे तत्कालीन संचालक,दूध संघाचे संचालक व सोलापूर जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे हे काँग्रेसचे माजी केंद्रीय गृह मंत्री सुशीलकुमार शिंदे आणि आमदार प्रणितीताई शिंदे यांच्यावर निष्ठा ठेवून काँग्रेसचे काम करत आहेत. तेही दक्षिण सोलापूर आगामी विधानसभा निवडणूक काँग्रेस पक्षाकडून लढविण्यासाठी कसून तयारी करीत आहेत. विकास कामं व सध्या वाढत असलेला जनसंपर्क पाहाता कुठल्याही परिस्थितीत विधानसभा लढवणारच,असा चंग त्यांनी बांधला आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील ८२ पैकी ६० सोसायटींवर हसापुरे गटाची एकहाती सत्ता आहे. त्यात त्यांचे सर्वच पक्षात मित्र असल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात निधी आणण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. काँग्रेसने जर जातीय समीकरणाचे कार्ड खेळण्याचा निर्णय घेतला. तर भाजप सोबत गेलेला लिंगायत समाज पुन्हा एकदा हसापुरे यांच्यामुळे काँग्रेसकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हा बँक, जिल्हा परिषद आणि आता दूध संघाच्या माध्यमातून त्यांचा शेतकऱ्यांसह शेतमजुरांशी थेट संपर्क आहे. त्यामुळे यंदाच्या लढाईसाठी ते सज्ज झालेले आहेत. अनेक विकास सोसायट्या आणि ग्रामपंचायतीवर देखील त्यांच्या गटाची सत्ता आहे. त्याचा फायदा होण्याचा त्यांना आशा आहे. वाढता जनसंपर्क पाहता ते विधानसभा निवडणुकीला सामोरे जातील,असा तर्क लढवला जात आहे.



सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष धवलसिंह मोहिते- पाटील यांनी नुकतेच वेगवेगळ्या विकासकामे व जनसंवाद यात्रा, मोर्चा या माध्यमातून जनसंपर्क वाढविला आहे. माजी खासदार कै. प्रतापसिंह मोहिते- पाटील यांच्यानंतर दक्षिण सोलापूर तालुक्यातील त्यांचा संपर्क कमी झाला होता. आता पुन्हा एकदा निवडणूक लढविण्याचे दृष्टीने ते दक्षिणचे दौरे करत असल्याची चर्चा आहे.

### उत्सुकता वाढली

यामध्ये आमदार सुभाष देशमुख यांचा कासव की, माजी आमदार दिलीप माने यांचा निर्णय खरा ठरणार की, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांचा जनसंपर्क की,जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील यांचे वाढते दौरे लाभदायी ठरणार का? याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.



# मार्केट कमिटीतील तह... समीकरण बदलाचे प्रयत्न...

उल्हास पाटील

करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत मोहिते -पाटील यांच्या मध्यस्थीने निवडणुका बिनविरोध करून जयवंतराव जगताप यांचा मार्ग सुकर करत विधानसभेच्या समीकरण बदल करण्याचे प्रयत्न मोहिते पाटलांचा दिसून येत आहे. एक तीर मे कई निशाने अशी रणनीती मोहिते पाटलांनी आखल्याचे दिसून येत आहे.

माढा लोकसभा, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस विधानसभा याठिकाणी शिंदे आणि मोहिते- पाटील यांच्यात सुप्त संघर्ष पाहायला मिळतो. करमाळा मतदार संघावर मोहिते पाटलांची चांगली पकड होती . करमाळ्यातील सर्व गटतटावर त्यांचा प्रभाव होता. गत २०१४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत आ. शिंदे यांनी करमाळा मतदार संघातून निवडणूक लढवली. त्यावेळी देखील मोहिते -पाटीलांनी विरोधी गटाला बळ देत आ. शिंदे यांचा पराभवात मोठी भूमिका बजावली. त्यानंतर शिंदे यांनी अपक्ष जिल्हा परिषदेची निवडणूक लढवली. त्यावेळची परिस्थिती पाहाता राष्ट्रवादीचा जिल्हा परिषद अध्यक्ष होणे अपेक्षित असताना शिंदे बंधूंनी मोहिते पाटील यांच्यावर मोठी खेळी करत जिल्हा परिषद अध्यक्षपद काबीज केले आणि जिल्ह्याचे नेते म्हणून नावारुपाला आले.

त्यानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अनेक नाट्यपूर्ण घडामोडीनंतर राष्ट्रवादीने माढा लोकसभेसाठी संजयमामा शिंदे यांना उमेदवारी देऊ केली. तोच भाजपने त्यांचेच मित्र असलेले रणजितसिंह निंबाळकर यांना लोकसभेची उमेदवारी देऊन मोठा डाव साधला. त्यावेळी मोहिते पाटील यांनी माळशिरस मतदार संघातून सुमारे सव्वा लाखाचा लिड दिला आणि निंबाळकरांच्या विजयासाठी नव्हे तर संजयमामा शिंदेच्या पराभवासाठी हातभार लावला.

आज परिस्थिती फार वेगळी आहे. राजकारणात फारकाळ कोण कुणाचाही शत्रू नसतो. वेळ येईल त्याप्रमाणे राजकारण बदलत असते. आज ज्या मोहिते- पाटलांनी खा.रणजितसिंह निंबाळकरांच्या विजयाची धुरा सांभाळली तेच मोहिते -पाटील आणि निंबाळकर आज माढा लोकसभेसाठी एकमेकांचे प्रतिस्पर्धी होऊ पाहात आहेत.

### मोहिते –पाटलांची लोकसभेची तयारी

करमाळा विधानसभा निवडणुकीत माजी आमदार जयवंतराव जगताप गटाने आ. शिंदे यांना मोठी साथ दिली. आ. शिंदे यांच्या विजयात जगताप गटाचा मोठा वाटा आहे. त्यामुळे आ.जगताप गटाला मदत म्हणून आ.संजयमामा शिंदे गटाने करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीतून माघार घेतली. पण त्यावर मोहिते– पाटलांनी मोठी खेळी करत जगताप ,पाटील, बागल गटांना एकत्र करत बाजार समितीची निवडणूकच बिनविरोध केली. एकीकडे करमाळा मतदार संघातील महत्वाचे तीन गट बागल, जगताप,पाटील यांना एकत्र आणून भविष्यातील होणाऱ्या विधानसभेसाठी आणि लोकसभेची तयारी यानिमित्ताने मोहिते –पाटील यांची दिसून येत आहे.





# आ. प्रणिती शिंदेंचा उत्तराधिकारी कोण?

## ‘मध्य’च्या आमदारकीचे अनेक जणांना डोहाळे

काँग्रेस भवनात पक्षनिरीक्षक माजीमंत्री बसवराज पाटील व रमेश बागवे यांच्या उपस्थितीत झालेल्या आढावा बैठकीत लोकसभेसाठी उमेदवार म्हणून आमदार प्रणिती शिंदे यांच्या नावाचा ठराव करण्यात आला. प्रणिती शिंदे यांना भावी खासदार म्हणूनच आता पाहिले जात आहे. त्यांचे वडील माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी देखील याला दुजोरा दिला आहे. त्यामुळे ठिकठिकाणी आ.प्रणिती शिंदे यांचे भावी खासदार म्हणून फलक झळकत आहेत. दुसरीकडे जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून लोकसभा मतदारसंघात झंझावत करत केंद्र शासनाच्या धोरणावर टीका करत आहेत. मात्र इकडे मध्य विधानसभा मतदार संघातील आ.प्रणिती शिंदे यांचा उत्तराधिकारी कोण ? हा प्रश्न निर्माण झाला आहे. काही जणांना आतापासून ‘मध्य’च्या आमदारकीचे डोहाळे लागल्याचे राजकिय चित्र मतदारसंघात आहे.

दीपक शेळके

आ. प्रणिती शिंदे यांनी सलग तीन वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत हा मतदारसंघ आपल्या पर्यायाने काँग्रेसच्या ताब्यात ठेवला. या मतदारसंघात काँग्रेसला मानणारा मोठा वर्ग आहे. बहुसंख्येने असलेला मुस्लीम समाज, मोची समाज कायमचा काँग्रेसच्या पाठीशी राहिला आहे. प्रणिती शिंदे यांनी आपल्या कामाच्या बळावर मतदारसंघात लोकप्रिय आहेत. त्यांचा मतदारसंघात मोठा जनसंपर्क आहे. २०१४ च्या मोदी लाट असो की, २०१९ मध्ये





एमआयएमचे कडवे आव्हान असताना देखील आ. शिंदे यांनी विजयश्री मिळवत हा मतदारसंघ ताब्यात ठेवला. आता सोलापूर लोकसभा मतदारसंघात आमदार प्रणिती शिंदे याच काँग्रेसच्या उमेदवार म्हणून फिक्स आहेत, असे सद्यातरी बोलले जात आहे. शहरात अनेक ठिकाणी त्यांच्या समर्थकांनी दिलेल्या शुभेच्छा फलकावर भावी खासदार असाच उल्लेख केला जात आहे. आ.शिंदे या लोकसभेवर निवडून गेल्या तर त्यांच्या हक्काच्या बालेकिल्यात म्हणजेच शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचा उत्तराधिकारी कोण याची चर्चा शहरात चालू आहे.

### धनगर समाजाची मागणी



चेतन नरोटे हे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार आणि आ. प्रणिती शिंदे यांचे कट्टर समर्थक मानले जातात. पाच टर्म नगरसेवक आहेत. शहरमध्य विधानसभा मतदारसंघात त्यांचा प्रभाग येतो. पालिकेच्या माध्यमातून स्थायी समिती सभापती, गटनेते आणि आता विद्यमान काँग्रेसचे शहराध्यक्ष आहेत. त्याशिवाय धनगर समाज त्यांच्याकडे भावी आमदार म्हणून पाहता त्याशिवाय त्यांच्या मागे तरुणांची आणि कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. आ. शिंदे यांच्या विजयामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा प्रत्येक वेळी प्रभागातून राहिला आहे. त्यामुळे नरोटे देखील प्रबळ दावेदार होऊ शकतात

### मोची समाजाचा दावा



माजी महापौर संजय हेमगडी यांच्या नावाची चर्चा आघाडीवर आहे. हेमगड्डी हे गेल्या वेळी इच्छुक होते. मात्र प्रणिती शिंदे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी आपल्या इच्छेला आवर घातला. हेमगड्डी यांनी देखील चार टर्म नगरसेवक राहिले आहेत. महापौर, सभागृह नेता असे अनेक पद भोगले आहेत. प्रणिती शिंदे यांच्या विजयात मोची समाजाचा मोठा वाटा आहे. हेमगड्डी या समाजाचे प्रतिनिधीत्वक करत असल्याने यांच्या नावाची चर्चा आहे. गतवेळी मध्यची जागा मोची समाजाला द्या म्हणून बंडाचे निशाण फडकवले होते. हे बंड शांत करण्यात हेमगड्डी यांचा सिंहाचा वाटा होता त्यामुळे ते देखील प्रबळ दावेदार होऊ शकतात

### मुस्लीम समाजदेखील आग्रही



माजी नगरसेवक दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघात निकराची लढत देवून भाजपच्या उमेदवारांचा घाम फोडणाऱ्या बाबा मिस्त्री यांच्या नावाची देखील मोठी चर्चा आहे. बाबा मिस्त्री यांनी आपण शहरमध्य विधानसभा मतदारसंघातून इच्छुक असल्याचे जाहीर केले आहे. बाबा मिस्त्री हे देखील पाच टर्म नगरसेवक राहिले आहेत. स्थायी समितीच्या माध्यमातून या मतदारसंघात चांगले काम आहे. त्याशिवाय आरोग्य समाजसेवेच्या माध्यमातून मतदारसंघात नाहीतर शहरात त्यांचे नाव आहे. या मतदारसंघात मुस्लिम मतदार संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने आ. प्रणिती शिंदे लोकसभेच्या उमेदवार राहिल्यास मुस्लिम समाजाला प्रतिनिधीत्व देण्याची मागणी करत या समाजाने देखील बंडाचे निशाण फडकावले होते.

### यांना देखील लॉटरी लागण्याची शक्यता

प्रणिती शिंदे लोकसभेवर गेल्यास शहर मध्य विधानसभा मतदारसंघाची लॉटरी लागणाऱ्यांमध्ये यशदा फौंडशनच्या माध्यमातून काम करणाऱ्या माजी नगरसेविका फिरदोस पटेल, आरिफ शेख, चाकोते परिवारातील सुदीप चाकोते. मराठा समाजाचे स्व. धर्मा भोसले यांचे वारसदार माजी नगरसेवक विनोद भोसले, मोची समाजाचे देवेंद्र भंडारे, या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलेले कोळी समाजचे प्रकाश यलगुलवार यांचे सुपूत्र मनोज यलगुलवार यांच्यासह एमआयएचे फारूख शाब्दी हे काँग्रसच्या वाटेवर आहेत. काँग्रेसमध्ये प्रवेश झाल्यास त्यांना देखील लॉटरी लागण्याची शक्यता आहे.